

**विवाह सोहळे...** ( पान ४ वर)


# आपलं नवे शहर

वाचकांच्या मनातील वृत्तपत्र







वर्ष : ३२ ● अंक : १३ ● मुल्य : २ रुपये ● पाने : ८ ● शुक्रवार, १६ मे २०२५ ● ठाणे ● RNI No. - 61792/94 ● Post-Reg. : NMB/136/2024-2026/Vashi MDG P.O.

# ‘कळंबोली जंक्शन’चे पालटणार रुपडे

## सर्कलवरील पनवेल एक्झिटचे काम अंतिम टप्प्यात; एक मार्ग लवकरच वाहतुकीसाठी खुला

**नवीन पनवेल** : ‘महाराष्ट्र राज्य पायाभूत विकास महामंडळ’कडून कळंबोली जंक्शनची नव्याने सुधारणा करण्यात येत आहे. त्यासाठी कळंबोली सर्कल येथे नव्याने उड्डाणपुल आणि भुयारी मार्गाचे काम हाती घेण्यात आले आहे. या कामामुळे कळंबोली सर्कल येथे वाहतूक कोंडी होऊ नये, यासाठी यशवंतराव चव्हाण मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील मुंबई वाहिनीवरील पनवेल एक्झिट ११ फेब्रुवारी २०२५ पासून ६ महिन्यांपासून बंद ठेवण्यात आला आहे. सध्या येथील काम अंतिम टप्प्यात आले असून लवकरच पनवेल एक्झिट वाहतुकीसाठी खुला होणार आहे.



दुसरीकडे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ देखील येत्या काळात सुरु होणार असून यापूर्वी विमानतळाला रस्ते जोडणीचे काम आता जलदगतीने सुरु झाले आहे. कळंबोली जंक्शनवर होत असलेल्या वाहतूक कोंडीमधून वाहन चालकांना दिलासा मिळणार आहे. सध्या सदरचे काम युध्द पातळीवर सुरू आहे. खोदकाम करायला सुरवात केली असून सर्व यंत्रणा जलदगतीने कामाला लावली आहे. पुलाचे पायाभरणीचे काम सुरु असून जवळपास १०० फाईल फाऊंडेशन म्हणजेच स्तंभ तयार झाले आहेत.

दरम्यान, एनएचएआय आणि सिडको यांच्या संयुक्त विद्यमाने, टीआयपीएल पनवेल यांच्या मार्फत सदर काम सुरू आहे.

**वाहतुकीसाठी पर्यायी मार्ग...**

मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरुन पनवेल, गोवा, जेएनपीटीकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना कोनफाटा (कि.मी. ९.६००) येथे डावीकडे वळण घेऊन एनएच-४८ मार्गावरून पळस्पे सर्कल येथून इच्छितस्थळी जाता येणार आहे. तसेच मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरून (पनेवल एक्झिट) येथून तळोजा, कल्याण-शिळफाट्याकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना सरळ पनवेल-शीव महामार्गावरुन पुरुषार्थ पेट्रोलपंप उड्डाणपुलाखालून उजवीकडे वळण घेऊन रोडपाली येथून एनएच-४८ महामार्गावरुन इच्छितस्थळी जाता येणार आहे.

**जंक्शन अपग्रेडेशनचे फायदे...**

कळंबोली जंक्शन अपग्रेड करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. याकरिता रस्ते विकास महामंडळ नोडल एजन्सी असून केंद्रीय रस्ते विकास विभागाकडून ७७० कोटी रुपयांचा निधी देण्यात आलेला आहे. यामुळे जंक्शन वाहतूक सिग्नल आणि ट्रॅफिक फ्री होणार आहे. त्यामुळे तासन्तास वाहनांना अडकून पडावे लागणार नाही. क्रॉस कॉनफ्लेक्ट सुध्दा दूर होणार आहे.

(उर्वरित पान २ वर)

# बांग्लादेशींना बनावट पासपोर्ट, जन्मदाखले बनवुन देणारे गजाआड

**पनवेल** : अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाने ५ मे रोजी पनवेल मधील करंजाडे येथे केलेल्या कारवाईमध्ये ५ बांग्लादेशी नागरिकांना अटक केली होती. या बांग्लादेशी नागरिकांना पनवेल मधील मोहम्मद इस्माईल अमिन्नोदीन येऊलकर (५२) याने कर्नाटक राज्यातील ईस्माइल शेख याच्यामार्फत बनावट पासपोर्ट आणि जन्मदाखले बनवून दिल्याचे तपासात आढळून आले आहे. त्यानुसार गुन्हे शाखेने ईस्माइल शेख आणि येऊलकर या दोघांना अटक केली आहे. तसेच न्यायालयाने अजामीनपात्र वॉरंट काढलेल्या आणखी २ बांगलादेशी नागरिकांना देखील भाईंदर येथून अटक केली आहे.




अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाने ५ मे रोजी पनवेल मधील करंजाडे भागातील इमारतीवर छापा मारुन त्याठिकाणी राहणाऱ्या ३ महिला आणि २ पुरुष अशा ५ बांग्लादेशी नागरिकांना अटक केली होती. पोलिसांनी केलेल्या तपासात या सर्वांनी भारतीय नागरिकत्वाचे आधारकार्ड, पॅनकार्ड, मतदान कार्ड तसेच पासपोर्ट बनवून घेतल्याचे आढळून आले होते. सदर बांग्लादेशी नागरिकांना मोहम्मद इस्माईल अमिन्नोदीन येऊलकर याने भारतीय कागदपत्र बनवण्याकरिता आणि भारतात वास्तव्य करण्यासाठी मदत केल्याचे तपासात आढळून आले. त्यामुळे पोलिसांनी या गुन्ह्यात येऊलकर

(उर्वरित पान २ वर)

# मलउदंचन केंद्र, धारण तलावाच्या कामांची आयुक्तांकडून पाहणी

## सुविधा कामांना गती द्या; आयुक्त डॉ. शिंदे यांचे निर्देश

**नवी मुंबई** : नवी मुंबई महापालिकेच्या वतीने सुरु असलेल्या सुविधा कामांची प्रत्यक्ष पाहणी करुन महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या वतीने या कामांना गती दिली जात आहे. या अनुषंगाने आयुक्तांनी वाशी आणि कोपरखैरणे विभागात अमृत २.० अंतर्गत सुरू असलेल्या मलउदंचन केंद्रे तसेच कोपरखैरणे, सेक्टर-१९ येथील धारण तलावाच्या कामांची प्रत्यक्ष पाहणी करीत आयुक्तांनी मौलिक सूचना केल्या. याप्रसंगी त्यांच्या समवेत शहर अभियंता शिरीष आरदवाड, अति. शहर अभियंता अरविंद शिंदे तसेच संबंधित अधिकारी आणि

(उर्वरित पान २ वर)



अशाच प्रकारे अमृत २.० योजना अंतर्गत सुरु असलेल्या कोपरखैरणे, सेक्टर-१९ मधील धारण तलावाच्या कामाला गती देण्याचे निर्देश देतानाच त्याठिकाणी बांधण्यात येत असलेल्या मलनि:स्सारण केंद्राच्या देखभाल-दुरुस्ती कामाचेही आत्ताच नियोजन करुन ठेवण्यात यावे. सदर तलाव मध्यवर्ती असून या ठिकाणी नागरिक मोठ्या संख्येने येत असतात. सदर बाब लक्षात घेत येथे नागरिकांच्या विरंगुळ्यासाठी बोटींग आणि इतर सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. या महसूलातून केंद्राचा देखभाल-दुरूस्ती खर्च होईल, अशा प्रकारच्या नियोजनाची खातरजमा करुन घ्यावी. **- डॉ. कैलास शिंदे, आयुक्त-नवी मुंबई महापालिका.**

# कंत्राटी कामगारांचे आमरण उपोषण स्थगित

## पोलीस प्रशासनाने मुख्याधिकारी जाधव, कॉन्ट्रॅक्टर यांच्याशी समन्वय साधून काढला मार्ग

**उरण** : उरण नगरपरिषद प्रशासनाने प्रलंबित निविदा प्रक्रियेसंदर्भात कराराची पुढील प्रक्रिया पूर्ण करण्यासाठीचे पत्र नवीन ठेकेदार कंपनीला दिल्यामुळे नगरपरिषद मधील कंत्राटीकामगारांनी १३ मे २०२५ पासून सुरू केलेले आमरण उपोषण वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र मिसाळ यांच्या सुचनेनुसार तात्पुरते स्थगित करण्यात आले आहे.




उरण नगरपरिषदेच्या घनकचरा विभागातील कंत्राटी कामगारांना ठेकेदार मे. भाग्यदिप वेस्ट मॅनेजमेंट यानी ३ मे २०२५ पासून बेकायदेशीरपणे कामावरुन कमी केले होते. त्याविरुध्द १३ मे पासून कंत्राटी दलित, आदिवासी गोरगरीब कामगारांनी बेमुदत आमरण उपोषण सुरू केले होते. आपली सहायक पोलीस आयुक्त यांच्या सूचनेनुसार मुख्याधिकारी, उरण नगरपरिषद यांच्या बरोबर सकारात्मक चर्चा झाली. त्यावेळी कोव्हीड कालावधीत जीवाची पर्वा न करता सदर कंत्राटी सफाई कामगारांना काम केले आहे. त्यांना न्याय देण्याच्या मागणीवर नगरपरिषद प्रशासनाने नवीन ठेकेदार कंपनीला ३ महिन्यापासून प्रलंबीत असलेले पत्र पुढील करार पूर्तीकरिता दिले असल्याने लवकरच प्रश्न निकालात निघतील, असे सकारात्मक वातावरण निर्माण झाले आहे. तसेच देशातील परिस्थिती विचारात घेऊन सहाय्यक पोलीस आयुक्त विशाल नेहूल आणि वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेन्द्र मिसाळ यांनी कंत्राटी कामगारांचे आंदोलन स्थगित करण्याची सूचना केली होती. त्यानुसार ‘म्युनिसिपल एम्प्लॉईज युनियन’चे पदाधिकारी

(उर्वरित पान २ वर)

# विजयनगर परिसरातील डिव्हायडर बनला अपघात केंद्र

## चालकाचे नियंत्रण सुटून डंपर चढला डिव्हायडरवर

**कल्याण** : कल्याण पूर्वेकडील पुना लिंक रोड येथील विजयनगर येथे रेतीने भरलेला डंपर ब्रेक निकामी झाल्याने डिव्हायडरवर चढून अपघात झाला. या अपघातात सुदैवाने कोणतीही जीवितहानी झालेली नाही. मात्र, सदरची २ महिन्यातील तिसरी घटना आहे. येथील काटे मानवली नाका ते पुना लिंक रोड, विजयनगर, तिसगाव नाका, चक्की नाका येथे मोठा उतार असल्याने अवजड वाहनांचे असे अपघात होत आहेत.



विजयनगर भागात अगदी काही दिवसांपूर्वी अशाच ब्रेक

(उर्वरित पान २ वर)

# इमारतीवरुन पडून कामगाराचा मृत्यू

## २ कॉन्ट्रॅक्टर विरुध्द गुन्हा दाखल

**पनवेल** : पनवेल मधील विरुपाक्ष मंदिरालगतच्या बांधकाम साईटवर काम करणाऱ्या कामगाराचा तिसऱ्या मजल्यावरुन खाली पडून मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. या घटनेतील मृत कामगाराला कॉन्ट्रॅक्टरकडून सुरक्षिततेच्या दृष्टीने कोणतीही साधने पुरविण्यात आली नसल्यामुळे त्याचा खाली पडून मृत्यू झाल्याचे तपासात आढळून आले आहे. त्यामुळे पनवेल शहर पोलिसांनी या घटनेला जबाबदार धरुन कॉन्ट्रॅक्टर आणि लेबर कॉन्ट्रॅक्टर या दोघांविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

या दुर्घटनेत मृत कामगाराचे नाव श्रीचंद मुनीराज पासवान (४६) असे असून तो पनवेल मधील विरुपाक्ष मंदिरालगतच्या सिध्दीविनायक सोसायटीच्या बांधकाम सुरु असलेल्या इमारतीवर काम करीत होता. तसेच तो त्याच ठिकाणी राहण्यास होता. १४ मे रोजी दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास श्रीचंद तिसऱ्या मजल्यावर काम करत असताना त्याचा तोल गेल्याने तो

(उर्वरित पान २ वर)

# अवकाळीने आर्थिक गर्तेत कुंभार व्यावसायिक

**भिवंडी**: हिंदू सणांतर्गत लागणाऱ्या मातीच्या वस्तू अथवा श्री गणेशमूर्ती प्रमाणे ठाणे जिल्ह्यात मार्च ते मे असे ३ महिने कुंभार समाजाच्या पिण्याच्या पाण्याचे माठ उत्पादन आणि विक्री करण्याचा व्यवसायिक हंगाम असतो. मात्र, गेल्या काही दिवसांपासून ऐन मे महिन्यात पाऊस सुरु असल्याने त्याचा परिणाम कुंभार व्यवसायावर झाला आहे.



भिवंडीत सुरु असलेल्या विविध व्यवसायाच्या आस्थापनेत कामगारांना पाणी पिण्यासाठी ठिकठिकाणी माठ अथवा मोठी रांजण आणले जातात. यंत्रमाग कारखाने, डाईंग, सायझिंग, गोदामे आदीमध्ये लाखोंच्या संख्येने कामगार काम करीत असल्याने शहरात माठ आणि रांजणे मिळून लाखाच्या संख्येने विक्री होते. एप्रिल आणि मे या २ महिन्यात माठाची विक्री मोठ्या संख्येने असल्याने शहरातील व्यावसायिकांनी आपल्या व्यवसायाच्या ठिकाणी माठाचा

(उर्वरित पान २ वर)

# ठाणे शहरात ड्रोन उडविण्यास मनाई

## पोलीस आयुक्तांकडून प्रतिबंधात्मक आदेश जारी

**ठाणे** : ठाणे शहर पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत आता ड्रोन किंवा इतर मानवरहित हवाई वस्तू उडविण्यास मनाई करण्यात आली आहे. शहरात काही समाजकंटकांकडून या उपकरणांचा वापर होण्याची शक्यता लक्षात घेता, कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी तसेच सार्वजनिक शांतता भंग होवू नये यासाठी सदर प्रतिबंधात्मक पाऊल उचलण्यात आले आहे.



ठाणे पोलीस आयुक्त कार्यालयाने याबाबत आदेश जारी केले आहेत. या आदेशानुसार, ठाणे शहर पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात कोणत्याही व्यक्तीला ड्रोन किंवा तत्सम उपकरणे उडविण्यास मनाई असेल. सदरचा आदेश १४ मे पासून लागू झाला असून तो ३ जून २०२५ पर्यंत अंमलात राहील.

(उर्वरित पान २ वर)

# ‘कासार्डी नदी संवर्धन’साठी महापालिकेचा पुढाकार

## नदी पुनरुज्जीवन प्रकल्प पाहणी; उपाययोजनांसाठी अतिरिक्त आयुक्त शेटे यांचे आस्थापनांना निर्देश

**पनवेल** : पनवेल महापालिका मार्फत तळोजा औद्योगिक परिसर आणि गावांना जोडणाऱ्या ‘कासार्डी नदी संवर्धन’साठी कासार्डी नदी पुनरुज्जीवन प्रकल्पांतर्गत प्रत्यक्ष पाहणी दौरा १४ मे रोजी आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे यांनी केला.



सदर पाहणी दौऱ्यांवेळी उपायुक्त स्वरुप खारगे, शहर अभियंता संजय कटेकर, उपअभियंता विलास चव्हाण, ‘महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ’चे डॉ. विक्रांत भालेराव, जलसंपदा उपअभियंता अमित पारळे, सार्वजनिक बांधकाम कनिष्ठ अभियंता मेंगाळ, एमआयडीसी प्रतिनिधी दिलीप बोबडे-पाटील, माजी नगरसेवक अरविंद म्हात्रे, आदि उपस्थित होते.

पनवेल महापालिका हद्दीतील तळोजा औद्योगिक परिसर आणि गावांना जोडणाऱ्या

(उर्वरित पान २ वर)

# ३० लाखांचे अंमली पदार्थ जप्त

## ६ महिन्यात ५० गुन्हे दाखल; ६५ तस्कर गजाआड

**कल्याण**: कल्याण परिमंडळ -३ पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांनी अंमली पदार्थ विरोधी कारवाईची मोहीम हाती घेतल्यानंतर गेल्या ६महिन्यात ६५ अंमली पदार्थ (ड्रग्स) तस्कर गजाआड करण्यात आले. तसेच याप्रकरणी ५० गुन्हे दाखल करीत पोलिसांनी एकूण ३० लाखांचे अमली पदार्थ जप्त केले आहेत.

अंमली पदार्थ विरोधी कारवाई सातत्याने सुरु ठेवतानाच रात्रीची गस्त वाढवत, निर्जनस्थळावर होणाऱ्या अंमली पदार्थाच्या पार्ट्यांवर पोलिसांनी लक्ष ठेवत गुन्हेगारांची धरपकड करण्याचेही सत्र राबविले आहे. नशेचे अड्डे उध्वस्त केले जात आहेत. ऑक्टोबर २०२४ ते मे २०२५ या कालावधीत कल्याण-डोंबिवली पोलिसांनी केलेल्या वेगवेगळ्या कारवाईत २९ लाख ५५ हजार रुपये किंमतीचा ११३ किलोहून अधिक गांजा, २५८ ग्राम एमडी, १० ग्राम चरस आणि निकोडीनयुक्त औषधाच्या बाटल्या, असा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे. या प्रकरणी ५० गुन्हे दाखल करत पोलिसांनी ६५ आरोपींना बेड्या ठोकल्या आहेत.

दरम्यान, पोलीस उपायुक्तांचे अंमली पदार्थ विरोधी पथक कायम सक्रिय असून केवळ नशेखोरांवरच नव्हे तर

(उर्वरित पान २ वर)

99675 20006 | aaplenaveshahar | NaveShahar | Nave Shahar | Nave Shahar

# वीज जोडणीसाठी अतिरिक्त सुरक्षा ठेव 'महावितरण'च्या पध्दतीनुसार

## 'टोरंट पॉवर'तर्फे प्रसिध्दीपत्रकाद्वारे स्पष्टीकरण

**भिवंडी** : 'टोरंट पॉवर'ने भिवंडीतील अनेक ग्राहकांना अतिरिक्त सुरक्षा ठेव (अतिरिक्त सिक्युरिटी डिपॉझिट) यासाठी पत्र पाठवले आहे. दरम्यान, याबाबत ग्राहकांना सविस्तर माहिती देण्यासाठी 'टोरंट पॉवर'कडून प्रसिध्दीपत्रक जारी करण्यात आले आहे. त्यानुषंगाने अतिरिक्त सुरक्षा ठेव पत्र 'महावितरण'च्या पध्दतीनुसार आणि एमईआरसी पुरवठा संहिता नियम, २०२१ च्या अनुषंगाने आहे. तसेच वीज कायद्याच्या कलम ४७ नुसार वीज जोडणी घेण्यासाठी ग्राहकांनी सिक्युरिटी जमा करणे बंधनकारक असल्याचे म्हटले आहे.



तर एमईआरसी सप्लाय कोड रेग्युलेशन २०२१ नुसार, सिक्युरिटी डिपॉझिटची रक्कम बिलिंग सायकल कालावधीच्या सरासरी बिलिंगच्या दुप्पट असणार आहे. या नियमांतर्गत सरासरी बिलिंग निश्चित करण्यासाठी, मागील १२ महिन्यांतील सरासरी बिलिंगचा विचार केला जातो. जर मागील १२ महिन्यांत विजेचा वापर वाढला असल्यास अतिरिक्त सुरक्षा ठेवीतही वाढ होते. ज्या प्रकरणांमध्ये वीजपुरवठा कमी कालावधीसाठी झाल्यास अशा परिस्थितीत कमी कालावधीच्या सरासरी बिलिंगचाही विचार केला जातो. तर वीजजोडणी सुरु असलेल्या ग्राहकांकडून आवश्यक असलेल्या सिक्युरिटी डिपॉझिटच्या रक्कमेची कंपनी दरवर्षी फेरगणना करेल, असेही सदर नियमावलीत नमूद करण्यात आले आहे.

त्यामुळे 'महावितरण'च्या कार्यपध्दतीनुसार 'टोरंट पॉवर'ने आपल्या ग्राहकांसाठी आर्थिक वर्ष २०२४-२५ मधील सिक्युरिटी डिपॉझिटचा आढावा घेतला असून अतिरिक्त सिक्युरिटी डिपॉझिटचे मागणीपत्र ग्राहकांना पाठविलेले आहे. यासह देयक सुलभतेसाठी, एमईआरसी नियमाप्रमाणे ग्राहकांना मागणी केलेली अतिरिक्त सुरक्षा ठेव ६ समान हप्त्यांमध्ये भरण्याचा पर्याय देण्यात आला आहे. विशेष बाब म्हणजे ग्राहकांनी भरलेली सिक्युरिटी डिपॉझिट टोरंट पॉवरकडे राहत नसून 'महावितरण'कडे राहते. दरवर्षी ग्राहकांना सिक्युरिटी डिपॉझिटवर आर्थिक वर्षाच्या शेवटी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या बँक दराइतके दराने व्याज दिले जात असल्याचे शेवटी नमूद केले आहे.

# के. रा. कोतकर विद्यालयाचा निकाल ९९.०३ टक्के

**डोंबिवली** : येथील उदय शिक्षण प्रसारक मंडळ संचालित के.रा. कोतकर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील इ.१० वी चा निकाल ९९.०३ टक्के लागला असून शाळेने आपली उज्वल निकालाची परंपरा कायम ठेवली आहे. प्रथम क्रमांक कु. भोसले तनुश्री प्रल्हाद ९०.८०टक्के, द्वितीय क्रमांक कु. डासाळ साक्षी दत्तात्रय ८९.८०टक्के, तृतीय क्रमांक कु. खैर देविका वैभव ८७.८०टक्के यांनी चांगली टक्केवारी मिळवून दहावीच्या परीक्षेत उत्तुंग यश संपादन केले. परिक्षा दिलेल्या एकूण १०३ पैकी १०२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.


कु. खैर देविका वैभव, कु. भोसले तनुश्री प्रल्हाद, कु. डासाळ साक्षी दत्तात्रय

विद्यार्थी, पालक व शिक्षक व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या मुख्याध्यपिका सौ. संगीता प्रकाश पाखले यांनी विदयार्थ्यांसाठी वर्षभर आखलेल्या नियोजनाचा व विद्यार्थ्यांच्या मेहनतीचा हा परिपाक आहे. शाळेतील सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा भक्कम पाया रचला व विद्यार्थ्यांनी त्यावर कळस चढवला. संस्थेचे अध्यक्ष आशुतोष रामदास येवले व इतर सर्व संचालकांनी स्वत: जातीने लक्ष घालून विविध शैक्षणिक उपक्रम राबवून मुलांना प्रोत्साहन दिले. फोटो उजवीकडून डावीकडे कु.खैर देविका वैभव,

# गर्डियन हायस्कुल दहावीचा निकाल १००टक्के

**डोंबिवली**: पूर्वेकडील भोपार येथील गर्डियन हायस्कुल अॅन्ड ज्युनिअर कॉलेजचा दहावी सीबीएससी परीक्षेत शाळेचा निकाल १०० टक्के लागला.

या परीक्षेत नंदिनी यादव ९६.३० टक्के, किमी विरळ दप्तरी ९३.६० टक्के तर गंधार देसाई ९३.२० टक्के गुण मिळवून पहिल्या तीन क्रमांकाने यादीत उत्तीर्ण झाले आहेत.

## विजयनगर...

(पान १ वरून)

निकामी झालेल्या मोठ्या ट्रकने ७-८ वाहनांना धडक दिली होती. यात ३ जण गंभीर जखमी झाले होते. अशा घटना यापूर्वीही इथे घडल्या आहेत. त्यानंतर आता पुन्हा एकदा डंपरचे ब्रेक निकामी होऊन अपघात झाल्याचा प्रकार घडला. या रस्त्यावर मोठा उतार असून मोठ्या अवजड वाहनांचे या रस्त्यावर ब्रेक दाबला तरी वाहन पुढे जात राहते. अशावेळी अनेकदा ब्रेक निकामी होण्याचा प्रकार होतो. त्यामुळे काटेमानिवली टेकडीचा चढ कल्याण- डोंबिवली महापालिकेने कापून समतल करावा. जेणेकरून अवजड वाहनांचे अपघात होणार नाहीत. तसेच सदर भागात वाहतूक पोलीस, वाहतूक नियंत्रणासाठी सिग्नल बसवले जावेत, अशी मागणी माजी नगरसेवक महेश गायकवाड यांनी केली आहे.



मात्र, येथील स्थानिक नागरिक अविनाश ओंबासे यांनी दिलेल्या माहितीनुसार सदर रस्त्यावर एक दिवसाआड अशा अपघाताच्या छोट्या-मोठ्या घटना घडत आहेत. तसेच या भागात शाळा आहेत. जर शाळा सुटल्यावर विद्यार्थी बाहेर पडताना असे अपघात झाल्यास मोठी दुर्घटना होऊ शकते, असे भितीही ओंबासे यांनी व्यक्त केली आहे.

दरम्यान, वाहतूक पोलीस आणि कल्याण-डोंबिवली महापालिकाने इथे ट्राफिक वॉर्डन नेमण्याची मागणी अनेक दिवसांपासून केली जात आहे. मात्र, आजतागायत इथे ट्राफिक वॉर्डन नेमला नसल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे.

## मलउदंचन...

(पान १ वरून)

अभियंते उपस्थित होते.

कामांची पाहणी करताना आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी वाशी, सेक्टर-३, १२ आणि २८ या तिन्ही ठिकाणच्या मलउदंचन केंद्रांच्या बांधकामाची पाहणी करीत सदर कामे जलद गतीने गुणवत्ता राखून पूर्ण करण्याचे निर्देश दिले. केंद्र सरकारच्या अमृत २.० अंतर्गत सदर कामे केली जात असल्याने ती विहित कालमर्यादेमध्ये पूर्ण होतील याची काळजी घेण्याच्या सूचना आयुक्तांनी केल्या. वाशी, सेक्टर-१० येथील भूमीगत आणि उच्चस्तरीय जलकुंभ कामाचीही पाहणी करीत आयुक्तांनी सदर काम जलद पूर्ण करावे. तसेच जलवितरणाच्या चाचणीचेही आत्तापासूनच नियोजन करुन ठेवावे, असे सूचित केले. पाणीपुरवठा आणि सांडपाणी व्यवस्थापन या दोन्ही बाबी महत्वाच्या असून त्या लवकरात लवकर नागरिकांसाठी उपयोगात येतील अशाप्रकारे या कामांचे नियोजन करावे, असेही निर्देश आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी यावेळी दिले.



## बांग्लादेशींना बनावट...

(पान १ वरून)

याला सह आरोपी करुन त्याला अटक केली.

त्यानंतर पोलिसांनी येऊलकर याची चौकशी केली असता, त्याने कर्नाटक राज्यातील कलबुर्गी येथील ईस्माइल शेख याच्यामार्फत सदर बांग्लादेशी नागरिकांचे बनावट पासपोर्ट आणि जन्मदाखले बनवल्याचे सांगितले. त्यानुसार सहाय्यक पोलीस निरीक्षक देशमुख यांचे पथक कर्नाटक राज्यातील कलबुर्गी येथे पाठविण्यात आले होते. सदर पथकाने ईस्माईल शब्बिर मिया शेख याला ताब्यात घेवून त्याच्याकडे सखोल चौकशी केली असता, त्याने पासपोर्ट तयार करण्यासाठी जन्मदाखले बनवून दिल्याचे कबूल केले. त्यानुसार पोलिसांनी त्याला अटक केली आहे.

त्यानंतर पोलिसांनी पनवेल येथून अटक केलेल्या बांग्लादेशी महिलेकडे भारतात राहणाऱ्या तिच्या इतर नातेवाईकांबाबत चौकशी केली असता, तिची आई आणि भाऊ मिरा-भाईंदर येथे वास्तव्यास असल्याचे तिने सांगितले. त्यानुसार पोलिसांनी भाईंदर पूर्व भागात राहत असलेला राहुल उर्फ मिकाईल ईस्माईल गाझी आणि त्याची आई सुफियाबेगम ईस्माईल गाझी या दोघांना भाईदर पूर्व येथील खरीगांव येथून अटक केली. त्या दोघांच्या चौकशीत सुफियाबेगम ईस्माईल गाझी हिच्या विरोधात मुंबई पोलिसांच्या विशेष शाखेने सन २०१२ मध्ये गुन्हा दाखल केल्याचे तसेच न्यायालयाने तिच्या विरोधात अजामीनपात्र वॉरंट काढल्याची माहिती मिळाली. त्यानुसार मुंबई पोलिसांच्या विशेष शाखेला याबाबत माहिती देण्यात आल्याची माहिती अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक पृथ्वीराज घोरपडे यांनी दिली.

सदरची कारवाई गुन्हे शाखेचे सहायक पोलीस आयुक्त अजयकुमार लांडगे, अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाचे सहायक पोलीस आयुक्त धर्मपाल बनसोडे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक पृथ्वीराज घोरपडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सरिता गुडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक योगेश देशमुख, अलका पाटील, पोलीस हवालदार अनिल मांडोळे आदिच्या पथकाने केली.

## इमारतीवरून पडून...

(पान १ वरून)

खाली पडला. यात श्रीचंद गंभीर जखमी झाल्याने त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, त्यापूर्वीच त्याचा मृत्यू झाला.

या दुर्घटनेनंतर पोलिसांनी केलेल्या तपासणीत सदर बांधकामाच्या ठिकाणी काम करणाऱ्या कामगारांना सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक असलेली साधने आणि कुठल्याच प्रकारच्या सोयी-सुविधा पुरविण्यात आले नसल्याचे आढळून आले. त्यामुळेच श्रीचंद पासवान या कामगाराचा तिसऱ्या मजल्यावरुन पडून मृत्यू झाल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे पनवेल शहर पोलिसांनी या घटनेला जबाबदार धरुन कॉन्ट्रॅक्टर इरफान दादुमिया पटेल आणि लेबर कॉन्ट्रॅक्टर मोहम्मद शफिकुल इस्लाम या दोघांविरोधात निष्काळजीपणाचा गुन्हा दाखल केला आहे. तसेच त्यांच्यावर पुढील कारवाईला सुरुवात केली आहे.

## ३० लाखांचे...

(पान १ वरून)

नशिल्या पदार्थाची विक्री करणारे तस्कर तसेच पुरवठादारांपर्यत पोहोचून सदरची साखळी तोडण्यासाठी आपले प्रयत्न सुरु असल्याचे कल्याण परिमंडळ-३ पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांनी यांनी सांगितले.

## कंत्राटी कामगारांचे आमरण उपोषण...

(पान १ वरून)




अध्यक्ष अॅड. सुरेश ठाकूर, कार्याध्यक्ष संतोष पवार, सरचिटणीस अनिल जाधव यांनी पोलीस प्रशासनाने दिलेल्या सुचनेचा आदर ठेवून कंत्राटी कामगारांचे आमरण उपोषण १९ मे २०२५ पर्यंत तात्पुरते स्थगित केले आहे.

त्याच प्रमाणे याच प्रश्नासह इतर प्रलंबित प्रश्नांसंदर्भात परिषद कार्यालयावर १६ मे रोजी काढण्यात येणारा मोर्चा देखील स्थगित करण्यात आला आहे.

दरम्यान, अल्प वेतनावर काम करणाऱ्या या दलित, आदिवासी, गोरगरीब कंत्राटी सफाई कामगारांच्या आमरण उपोषणावेळी अॅड राजेंद्र मढवी, 'उरण उत्कर्ष समिती'चे अध्यक्ष गोपाळ पाटील, 'म्युनिसिपल एम्प्लॉईज युनियन'चे उरण युनिट कार्याध्यक्ष मधुकर भोईर, सामाजिक कार्यकर्त्या सिमा घरत, वंदना पवार, माजी नगराध्यक्ष परमानंद करंगुटकर, पत्रकार जगदीश तांडेल, मधुकर ठाकूर, प्रविण पुरो, सामाजिक कार्यकर्ते मनिष कातकरी, शेखर पाटील, सचिन वर्तक यांनी भेट दिली.

## कासार्डी नदी...

(पान १ वरून)

'कासार्डी नदी संवर्धन'साठी महापालिकेने पाऊले उचलेली आहेत. त्यानुषंगाने आयुक्त चितळे यांनी 'प्रदुषण नियंत्रण मंडळ'च्या अधिकाऱ्यांशी याविषयी चर्चा करुन बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. 'कासार्डी नदी संवर्धन'साठी योग्य ती उपाययोजना करण्याकरिता नियोजनाची जबाबदारी महापालिकेला देण्यात आली आहे. या अनुषंगाने लवकरच आराखडा तयार करण्यात येणार आहे. त्या पार्श्वभूमीवर सदर बैठक महत्वाची होती.

'कासार्डी नदी संवर्धन'साठी रायगड जिल्हाधिकारी यांनी सूचना केल्या आहेत. सदर पत्रानुसार कासार्डी नदी पुनरुज्जीवित करण्यासाठी विविध आस्थापनांसोबत पाहणी दौरा आयोजित करुन प्रत्यक्ष नदी पात्राची पाहणी करण्यात आली. यावेळी अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे यांनी सदर नदी पुनरुज्जीवित करण्यासाठी संयुक्तपणे कार्यवाही करताना संबंधित आस्थापनांना विविध निर्देश दिले.

पनवेल महापालिका हद्दीमधील प्रदुषित कासार्डी नदीचे पुनरुज्जीवन करण्याच्या उद्देशाने विविध कंपन्यांकडून नदी पात्रात सोडण्यात येणाऱ्या सांडपाण्यावर देखरेख करुन त्याचे स्क्रीनींग करण्याविषयीचे निर्देश संबधित आस्थापनाना देण्यात आले. गणेश घाट, तोंडरे येथील नदी पात्रात अनधिकृतरित्या कंपनीद्वारे, टँकरने केमिकलयुक्त पाणी, सांडपाणी सोडले जाते. अशा कंपन्या, टँकरवर कारवाई करण्याबाबत 'प्रदुषण नियंत्रण मंडळ'ला सूचित करण्यात आले.

गणेश घाट, तोंडरे येथील नदी पात्रात 'स्मॉल चेन ऑफ बंधारे' बांधण्याबाबत नियोजन करणे, काप्रेचार्य मंदिर, नावडे येथे भरतीच्या वेळी नदीचे पाणी गावामध्ये घुसू नये यासाठी गॅबियन वॉल बांधण्यासाठी नियोजन करण्याबाबत महापालिकेच्या अधिकाऱ्यांना अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे यांनी निर्देश दिले.

'कासार्डी नदी'च्या पूर रेषेबाबत महापालिकेस माहितीस्तव पत्र देणे आणि नदीचा मूळ प्रवाह उन्हाळ्यात देखील प्रवाहीत राहिल या दृष्टीने नदीमधील अडथळे काढून टाकण्याबाबत, तसेच 'कासार्डी नदी'मधील केमिकलयुक्त पाणी 'सीईटीपी'ला ट्रान्सफर करून त्यावर प्रक्रिया करणेस्तव नियोजन करणे, एमआयडीसी हद्दीतील रस्त्याच्या बाजुला उभे करण्यात येणाऱ्या टँकरवर कारवाई करण्याबाबत एमआयडीसी आस्थापनांना अतिरिक्त आयुक्त शेटे यांनी निर्देश दिले.

गणेश घाट, तोंडरे येथील नदी पात्रात करण्यात आलेल्या अनधिकृत बांधकामावर कारवाई करण्याबाबत जलसंपदा विभागास सूचित करण्यात आले. तर कासार्डी नदी पात्रात अनधिकृतरित्या कंपनी, टँकरद्वारे केमिकलयुक्त पाणी, सांडपाणी सोडले जाऊ नये यासाठी ठिकठिकाणी सोलार बेस सीसीटीव्ही कॅमेरे लावण्याबाबत शेटे यांनी 'प्रदुषण नियंत्रण मंडळ'ला निर्देश दिले.

दरम्यान, 'कासार्डी नदी'चे पुनरुज्जीवन करण्याच्या उद्देशाने विविध आस्थापनांच्या झालेल्या सदर संयुक्त दौऱ्यामध्ये 'कासार्डी नदी संवर्धन'बाबत विविध मुद्यांवर सविस्तर चर्चा करुन संबंधितांना उचित कार्यवाही विहीत मुदतीत करण्याचे आदेश अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे यांनी दौऱ्याच्या शेवटी दिले.

याप्रसंगी पर्यावरण विभाग प्रमुख मनोज चव्हाण, 'टीआयए'चे सतिश शेट्टी, सुनिल पडलानी, प्रभाग अधीक्षक जितेंद्र मढवी, सहाय्यक अभियंता औदुंबर अलाट, सहाय्यक अभियंता एच. एन. सरग, सहाय्यक अभियंता निवृत्ती चंदेवाड, आदि उपस्थित होते.

# संदीप पाटील यांचा सामाजिक कार्यात नेहमीच पुढाकार -आ. प्रशांत ठाकूर



**पनवेल** : संदीप पाटील सातत्याने सामाजिक उपक्रम राबवत असतात. त्यामुळे ते वयाच्या पन्नाशीनंतरही आणखी जोमाने आणि उमेदीने कार्यरत राहतील, असे प्रतिपादन आमदार प्रशांत ठाकूर यांनी नवीन पनवेल येथे केले.

माजी नगराध्यक्ष आणि 'भाजपा'चे शहर उपाध्यक्ष संदीप पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित महिलांसाठी कबड्डी स्पर्धेवेळी आ. प्रशांत ठाकूर बोलत होते. यावेळी भाजप जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, माजी नगरसेवक गणेश कडू, नवीन पनवेल मंडल अध्यक्ष दशरथ म्हात्रे, माजी उपमहापौर चारुशीला घरत, माजी नगरसेविका सुशीला घरत, वर्षा नाईक, भीमराव पोवार, विजय म्हात्रे, माजी जिल्हा परिषद सदस्य सुरेखा पाटील, रवी नाईक, सूर्यकांत ठाकूर, आदि उपस्थित होते.

संदीप पाटील यांना खेळाची आवड आहे, म्हणून त्यांचा फिटनेस चांगला आहे. खेळांना ते प्रोत्साहन देत असतात. सामाजिक कार्यात अग्रेसर राहून नागरिकांना सुविधा देणे, विविध योजना राबविणे असे त्यांचे काम सुरू असते. भविष्यात त्यांना आणखी जोमाने काम करायचे आहे आणि मोठे सामाजिक कार्य त्यांच्या हातून घडावे, अशी शुभेच्छा आमदार ठाकूर यांनी यावेळी दिल्या.

ओम साई कलावंत मंडळाने माझ्या अनुपस्थितीत जिल्हास्तरीय कबड्डीची लिग स्पर्धा आयोजित केली. नागरिकांनी मला सामाजिक कार्याची संधी दिली, त्यामुळे मी इथपर्यंत पोहोचलो. भाजपा आणि आमचे मार्गदर्शक आमदार ठाकूर यांच्या माध्यमातून आणखी उत्तरोत्तर प्रगती करता येईल, नागरिकांची कामे करता येतील, असेमाजी नगराध्यक्ष संदीप पाटील आपल्या प्रास्ताविकात म्हणाले.

सदर जिल्हास्तरीय लिग स्पर्धा यशस्वी करण्यासाठी ओम साई कलावंत मंडळाने नितीन चोरघे, मयुर कदम, अभिजित दिवेकर, सुयोग पाटील, प्रमोद म्हामुणकर, मंगेश घरत आदिंनी प्रयत्न केले. तर या स्पर्धेत वृतिक्षा स्पोटस् क्लब-पेण, कर्नाळा स्पोर्टस् अकादमी-पनवेल, दिलखुश क्रीडा मंडळ-अलिबाग, श्री सुवर्ण गणेश-दिवेआगर या संघांनी सहभाग घेतला.

## ३० लाखांचे...

(पान १ वरून)

साठा करुन ठेवला होता. नुकताच अवकाळी पाऊस झाल्याने भट्टी लावता येत नसल्याने ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण भागात माठ बनविण्याचे बंद झाले. त्यामुळे उत्पादन करणारे आणि विक्री करणाऱ्या कुंभारांना या पावलाचा चांगलाच फटका बसला आहे.

### व्यवसायाचे नुकसान

मे महिन्यासाठी आम्ही माठांचा मोठा साठा केला आहे. मात्र, ग्राहक नसल्याने आमचे भांडवल गुंतून राहिले असून जागा देखील अडली आहे. त्याचबरोबर वर्षभर सदरचा माल सांभाळावा लागणार असून पुढील सणाचा गणपतीच्या मूर्तीसाठी जागा शिल्लक नसल्याने अडचण निर्माण झाली आहे. एका हंगामानंतर दुसऱ्या हंगामाची आमची तयारी असते. मात्र, यावेळी पावसामुळे व्यवसायाचे नुकसान केले आहे.

**-दिनेश घोष्टेकर, व्यावसायिक.**

## ठाणे शहरात...

(पान १ वरून)

या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीवर भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम २२३ आणि इतर लागू कायद्यानुसार कारवाई केली जाईल, असे स्पष्ट करण्यात आले आहे. परिस्थितीचे गांभीर्य आणि तातडी लक्षात घेवून आदेश तातडीने लागू करण्यात आला आहे, असेही नमूद करण्यात आले आहे.

उपायुक्त (मुख्यालय-१) विशेष शाखा-ठाणे शहर डॉ.श्रीकांत परोपकारी यांनी सदर आदेश जारी केले आहेत.

## कळंबोली जंक्शन...

(पान १ वरून)

परिणामी, वेळ आणि इंधन वाचणार आहे. तर माती परीक्षणाचे काम सुध्दा युध्द पातळीवर सुरू आहे. या व्यतिरिक्त कामामध्ये कोणताही व्यत्यय येऊ नये यासाठी ६ महिन्यांसाठी मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर पनवेल एक्झिट बंद करण्यात आली आहे. भूमीपुजनानंतर कामाला बराच उशीर झाला; पण अखेर कामाला सुरुवात झाली असून नवी मुंबईची स्वागतकमान असणाऱ्या या कळंबोली जंक्शनचे रुपडे पालटणार आहे. याची डिझाईन पाहता होणारी ट्रॅफिक समस्येचा तिढा सुटणार आहे.

**CHANGE OF NAME**

I have changed my name from **PRAKASHKUMAR SHREE MOHANLAL** to **PRAKASH MOHANLAL PRAJAPATI** as per document. Address : Shop No.4, Jay ashapura store, akurli road near bhudh vihar damu Nagar bhim nagar kandivali East Mumbai 400101.

**CHANGE OF NAME**

I **PRANITA DEVENDRA SHETYE** have changed my name from **SHARMILA RAMCHANDRA REDIJ** to **PRANITA DEVENDRA SHETYE** VIDE Affidavit having Reg. No. 34, Sr. No. 6575 dated-15/05/2025, Mob. No. 8356892706.

**TENDER NOTICE**
**(Issued Without Prejudice)**

EXTENSION OF TENDER SALE DATE TILL 22.5.2025
Redevelopment / Reconstruction of COSMOPOLITAN - II CO-OP HOUSING SOC. LTD. Reg. No. N.B.O.M / CIDCO / HSG / (O.H) / 768 / J.T.R / 1999-2000, on plot of land area admeasuring 7178.85 Sq. Mtrs. at Punit Park, Plot No. 182C, Sector-17, Nerul (East), Navi Mumbai – 400 706. The society plot is leased by M/s CIDCO Ltd. and have clear title.
Considering the request from few developers, the sale of tender document is extended till 22.05.2025.
Sealed tenders are invited from reputed, experienced and financially sound Developers for Redevelopment / Reconstruction of society buildings. The society having 109 flats in tower building, 27 row houses , 20 shops and society office, abating 20 meter wide road, in the iconic location of Nerul.
Tender documents will be available at Society office of Cosmopolitan II Co-Op. Housing Soc. Ltd., Punit Park, Plot No. 182C, Sector-17, Nerul, Navi Mumbai – 400 706 between 10.30 A.M. to 12.30 P.M. and from 5.30 to 8.30 P.M., all days, on payment of Rs. 100,000/- (non-refundable basis) through DD/Pay order in favour of "Cosmopolitan-II Co-Op. Housing Soc. Ltd."

Sd/-
**Hon. Chairman / Hon. Secretary**
For, Cosmopolitan-II
Co-Op. Housing Soc. Ltd.
Contact: +91 9322406863
& 9833412145

Date: 16/05/2025

# अवकाळी पावसामुळे मासेमारी व्यवसायाच्या नुकसान भरपाईसाठी शासनाचे सहकार्य - ना. मकरंद जाधव-पाटील



**मुंबई** : अवकाळी पावसामुळे ठाणे आणि पालघर जिल्ह्यात मासेमारी बोटींचे, जाळी, सुकी मासळीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. नुकताच मत्स्य व्यवसायाला कृषी दर्जा देण्यात आलेला आहे. त्या निकषानुसार नुकसानग्रस्त मत्स्य व्यवसायिकांना तात्काळ मदत देण्यात येईल, असे मदत-पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी सांगितले.

ठाणे आणि पालघर जिल्ह्यात अवकाळी पावसामुळे मत्स्य व्यवसाय संबंधित झालेल्या नुकसानीबाबत मंत्रालयात आढावा बैठक झाली. यावेळी मत्स्यव्यवसाय-बंदरे मंत्री नितेश राणे, मदत-पुनर्वसन विभागाचे सहसचिव कैलास गायकवाड, अवर सचिव सुनिल सावंत, मत्स्य व्यवसाय विभागाचे आयुक्त किशोर तावडे, उपसचिव किशोर जकाते आणि संबंधित अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

ना. मकरंद जाधव-पाटील म्हणाले, ६ मे २०२५ रोजी झालेल्या वादळ आणि अवकाळी पावसामुळे पालघर जिल्ह्यातील डहाणू येथील मच्छीमारांच्या सुमारे ९६ बोटींचे नुकसान झाले आहे. पालघर जिल्ह्यातील अर्नाळा येथील अनेक मच्छीमारांचे सुकवण्यासाठी घातलेल्या मासळीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे. नुकताच मत्स्यव्यवसायाला कृषीचा दर्जा देण्यात आलेला असून त्यानुसार मदत करण्यात येईल, असेही श्री. जाधव-पाटील यांनी सांगितले.

ना. नितेश राणे म्हणाले, नुकताच मत्स्य व्यवसायाला कृषीचा दर्जा देण्यात आला आहे. त्यामुळे मच्छीमारांना शेतकऱ्यांप्रमाणे योग्य ती नुकसान भरपाई मिळणे आवश्यक आहे. तसेच शासन निर्णयात काही बाबींसाठी तरतूद, वाढीव मागणीबाबत मदत-पुनर्वसन विभागाने प्रस्ताव तयार करावा, असे ना. राणे यांनी सांगितले.

मत्स्य व्यवसायाच्या अवकाळी नुकसानीबाबत वाढीव मागणीचा प्रस्ताव तयार करून मंत्रिमंडळ बैठकीत सादर करण्यात येईल, ना. जाधव-पाटील यांनी सांगितले.

# मोबाईल, १०० रुपये लुटण्यासाठी ५५ वर्षीय व्यक्तीला ब्रीजवरुन ढकलले

**२ लुटारु गजाआड**

नवी मुंबई : लुटमारी करण्याच्या प्रयत्नात दोघा लुटारुंनी एका व्यक्तीला ब्रिजवरून खाली टाकून देत त्याचा जीव घेण्याचा प्रयत्न केल्याची घटना वाशी मध्ये घडली. यात सदर व्यक्ती गंभीर जखमी झाला असून त्याला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. सदर घटनेनंतर वाशी पोलिसांनी लुटमारी करणाऱ्या दोन्ही आरोपीं विरोधात जबरी लूट तसेच जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करुन दोघांना अटक केली आहे.

या घटनेतील गंभीर जखमी झालेल्या व्यक्तीचे नाव मिलिंद मधुकर इंगळे (५५) असे असून ते वाशी, सेक्टर-१५ मध्ये राहण्यास आहेत. १३ मे रोजी रात्री ११.१५ वाजण्याच्या सुमारास मिलिंद इंगळे वाशीतील पामबीच मार्गावरुन पीकेसी हॉस्पीटल जवळच्या ब्रीजवरून पायी चालत घरी चालले होते. यावेळी तेथे ठिकाणी दबा धरून बसलेल्या आरोपी चिन्मय शशिकांत ढवळे (२१) आणि रोहन रविंद्र जगताप (२०) या दोघा लुटारुंनी मिलिंद इंगळे यांना लुटण्याचा प्रयत्न केला असता, इंगळे यांनी दोघा लुटारुंना प्रतिकार केला.

त्यामुळे दोघा लुटारुंनी मिलिंद इंगळे यांना मारहाण करून त्यांच्या जवळ असलेले १०० रुपये आणि त्यांचा मोबाईल फोन लुटला. त्यानंतर त्यांनी मिलिंद इंगळे यांना तेथील ब्रीज वरून खाली टाकून देत पळून जाण्याचा प्रयत्न केला. यावेळी इंगळे यांनी आरडा-ओरडा केल्याने नागरिकांनी दोघा लुटारुंपैकी चिन्मय ढवळे याला पकडले. मात्र, त्याचा साथीदार पळून जाण्यात यशस्वी झाला. सदर घटनेची माहिती मिळताच वाशी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन आरोपीला ताब्यात घेतले. त्यानंतर पळून गेलेल्या रोहन जगताप याला १४ रोजी चेंबूर येथे अटक केली. या दोन्ही आरोपींची तळोजा जेलमध्ये न्यायालयीन कोठडीत रवानगी करण्यात आली आहे.

# महिला बचत गटामार्फत कर पावत्या वितरण



**वाशी** : नवी मुंबई महापालिकेच्या मालमत्तांचे कर पावती वितरण यापुढे बचत गटातील महिला करणार आहेत. त्यासाठी महिला बचत गटांना एप्रिल पासून पहिल्या टप्प्यातील प्रशिक्षण देण्यात येत होते. १५ मे रोजी तुर्भे विभागात अखेरचे प्रशिक्षण पार पडले असून अंतिम प्रशिक्षण वाशी विभागात देण्यात येणार आहे.

नवी मुंबई शहरात लाखो नोंदीत मालमत्ता आहेत. या मालमत्तांचे वर्षातून दोनदा सहामाही मालमत्ता कर मालमत्तांना आकारले जाते. त्याच्या कर पावत्या महापालिका कर्मचारी वितरण करीत असतात. त्यामुळे महापालिका कर्मचाऱ्यांवर कामाचा अतिरिक्त ताण पडत असे. त्यामुळे कर पावती वाटप प्रणाली अधिक सुलभ व्हावी आणि या माध्यमातून महिलांना देखील अल्प रोजगाराची संधी प्राप्त व्हावी म्हणून सदर कर पावत्या बचत गटातील महिलांच्या माध्यमातून वाटप करण्याचा निर्णय महापालिका प्रशासनाने घेतला आहे.

सदर पावत्या वाटपाआधी महिलांना त्याचे योग्य प्रशिक्षण मिळावे म्हणून महापालिकेने एका संस्थेची नियुक्ती केली आहे. त्यामुळे महिलांनी फोन मधील प्रॉपर्टी टॅक्स (मालमत्ता कर बिल) वाटपाचे काम करण्याचे ॲप्स (प्रणाली) कसे हाताळायचे? याची पूर्ण माहिती असणे आवश्यक आहे. त्याकरिता सदर ॲप्स हाताळण्याचे पहिल्या टप्प्यातील प्रशिक्षण महापालिकातर्फे आणि या संस्थेच्या माध्यमातून २१ एप्रिल पासून महापालिका मुख्यालयात देण्यास सुरुवात केली होती. याचे अखेरचे प्रशिक्षण १५ मे रोजी तुर्भे विभागात पार पडले असून अंतिम प्रशिक्षण आता वाशी विभागात पार पडणार आहे. त्यानंतर महिला मालमत्ता कर पावत्या घरोघरी वाटताना दिसतील.

नवी मुंबई महापालिका शहरातील महिलांना स्वयंरोजगारात सक्षम करण्यासाठी नेहमीच पुढाकार घेत आली आहे. महापालिकेचा निर्णय स्वागतार्ह आहे. महिलांना प्रशिक्षण देऊन त्यांच्या हाती मालमत्ता कर वाटप दिल्याने अशा महिलांना अल्प रोजगार उपलब्ध करुन दिल्याने याचे स्वागत केले पाहिजे, असे मत आई माऊली बहुउद्देशीय सामाजिक महिला संस्थेच्या अध्यक्षा दर्शना भोईर यांनी सांगितले.


## जाहीर नोटीस / न्यू एस मोटार ट्रेनिंग स्कूल हस्तांतरणाबाबत

**संदर्भ** : सिटी मॉल, प्लॉट नंबर ०४ ए विंग , शॉप न. जी १०११ , सेक्टर १९ , नियर आयसीएल स्कूल , तुर्भे, नवी मुंबई तालुका जिल्हा ठाणे.

सदर आस्थापनेचे नाव - न्यू एस मोटार ट्रेनिंग स्कूल , व्यवसायाचे स्वरूप - मोटार ट्रेनिंग स्कूल यांचे मालक सुभाष पंढरीनाथ चौगुले यांचा अपघाती मृत्यू दिनांक २३/०५/२०२३ रोजी झाला असून त्यांचा व्यवसाय, व्यवसायाचे स्वरूप - मोटर ट्रेनिंग स्कूल असून सदर व्यवसाय त्यांची पत्नी श्रीमती - गजराबाई सुभाष चौगुले त्यांच्या नावावर हस्तांतर होण्यासाठी जाहिरात देत आहेत. यासंदर्भात कोणाची काही तक्रार असल्यास पंधरा दिवसाच्या आत संपर्क साधावा.

**दिनांक** : १६/०५/२०२५
**ठिकाण** : नवी मुंबई

सही/-
श्रीमती - गजराबाई सुभाष चौगुले
मारुती दर्शन , प्लॉट नंबर - ३८२ , रूम नंबर - ८ ,
सेक्टर - १९ , कोपरखैरणे , नवी मुंबई ४००७०९
मोबाईल नंबर ८९७६३३३०३३


# शासनाचे अधिकृत संकेतस्थळ देखभालीसाठी बंद

**मुंबई** : महाराष्ट्र राज्य शासनाचे अधिकृत संकेतस्थळ www.maharashtra.gov.in आणि शासन निर्णय संकेतस्थळ www.gr.maharashtra.gov.in असे पोर्टल नियमित देखभालीबरोबरच तांत्रिकदृष्ट्या अद्ययावत करण्यात येणार आहेत. त्यासाठी १५ आणि १६ मे असे दोन दिवस या पोर्टलची सेवा बंद राहील, असे 'महाराष्ट्र माहिती-तंत्रज्ञान महामंडळ'ने कळविले आहे.

सदर कालावधीत महाराष्ट्र राज्य शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर कोणतीही सेवा उपलब्ध राहणार नाही. याची राज्यातील सर्वसामान्य नागरिक आणि शासकीय अधिकारी-कर्मचाऱ्यांनी नोंद घ्यावी, असेही 'माहिती-तंत्रज्ञान महामंडळ'ने प्रसिध्दीपत्रकान्वये कळविले आहे.

# झाडांच्या पडझडीमुळे अनेक वाहनांचे नुकसान

**ठाणे**: शहरातील विविध भागांमध्ये गेल्या ४ महिन्यात तब्बल ५७ झाडांची पडझड झाल्याने अनेक वाहनांचे नुकसान झाले आहे. गेल्या आठवड्यात अवकाळी पाऊस आणि सोसाट्याचा वारा यामुळे झाडे पडण्याच्या ८ घटना घडल्या असून मोठ्या झाडाच्या ४ फांद्या पडल्या असल्याची नोंद ठाणे महापालिका आपत्ती व्यवस्थापन विभागात करण्यात आली आहे.

झाडांच्या पडझडीमुळे ४ दुचाकी, तीनचाकी १, चारचाकी १ वाहनांचे नुकसान झाले आहे. तर झाड पडल्याने 'महावितरण'च्या विद्युत डीपी आणि ३ दुकानांचे नुकसान झाल्याची नोंद आहे.

दरम्यान, ठाण्यात गत १२ महिन्यात तब्बल ६७५ झाडे पडून शेकडो वाहनांचे नुकसान झाल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन विभागातर्फे देण्यात आली.

# पंधरवड्यात १३ बांग्लादेशींना अटक

**भिवंडी**: बांग्लादेशी घुसखोरांविरुद्धची अटकेच्या कारवाईचे धाडसत्र भिवंडी पोलिसांकडून सुरुच असताना १३ मे रोजीच्या मोहिमेत ठाणे गुन्हे शाखेने २ बांग्लादेशी नागरिकांना ताब्यात घेऊन त्यांच्या विरोधात भिवंडीतील २ पालीस ठाण्यात गुन्हा नोंदवत बांग्लादेशींना अटक करण्यात आली.



भिवंडीत २ आठवड्यात एकूण १३ बांग्लादेशींना अटक करण्यात आल्याची माहिती देण्यात आली.

शेदुलआलम जलाल शेख (३२) आणि ३५ वर्षीय महिला असे अटक करण्यात आलेली बांग्लादेशी दुक्कल आहे. सदर महिला हनुमान टेकडी परिसरातील खदान रोड नजिकच्या गल्लीत भाडेतत्वावर वास्तव्य करीत असल्याचे अनैतिक ठाणे मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष गुन्हे शाखेच्या पोलीस पथकाकडून सांगण्यात आले. तर नारपोली पोलीस ठाणे हद्दीतून गुन्हे शाखेने बांग्लादेशी घुसखोर रशेदुलआलम याला ताब्यात घेण्यात आले.

# उल्हासनगरमध्ये पत्नी व मुलीची हत्या करून व्यापाऱ्याची

**उल्हासनगर**: सोन्याचे दागिने बनविण्याचा व्यवसाय करणाऱ्या पवन पहूजा (५१) यांनी १५ मे रोजी पत्नी आणि मुलीच हत्य केली व नंतर स्वत: आत्महत्या केली. सदर घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. तिन्ही मृतदेह शवविच्छेदनासाठी उल्हासनगरच्या मध्यवर्ती रुग्णालयात पाठविण्यात आले आहेत. पुढील तपास पोलीस करीत आहेत.

उल्हासनगर१, बेबस चौक या ठिकाणी वर्षा कॉटेज इमारतीमध्ये पवन पहुजा हे त्यांची पत्नी नेहा (४८) आणि मुलगी रोशनी यांच्यासह राहत होते. पवन सोने चांदीचे दागिने बनविण्याचे कारागीर होते. गेल्या काही दिवसांपासून पवन यांनी लाखो रुपयांचे दागिने बनवून सोन्याच्या दुकानदारांना दिले होते, मात्र त्याचे पैसे या दुकानदारांनी दिले नसल्यामुळे ते कर्जबाजारी झाले होते, तसेच सहा महिन्यांपूर्वी पवन यांचा मुलगा सागर (१२) याचा हृदयविकाराने मृत्यू झाला.या परिस्थितीमुळे ते वैफल्यग्रस्त होते. अशी प्राथमिक माहिती समोर येत आहे.

दरम्यान, आत्महत्या करण्यापूर्वी त्याने मोबाईल मध्ये व्हिडिओ बनविला असून पोलिसांनी पवन यांचा मोबाईल फोन ताब्यात घेतला असून पोलीस तपासानंतर या प्रकरणामागील सत्य उघड होण्याची शक्यता आहे. दरम्यान, नुकतेच दहावीच्या निकालात पवन यांचा मुलगी रोशनी चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाली होती यामुळे त्यांच्या घरात उत्साहाचे वातावरण होते मात्र त्यानंतर ही घटना होईल अशी कोणीच कल्पना केली नव्हती असे स्थानिक नागरिकांनी सांगितले .


## ठाणे महानगरपालिका, ठाणे

सा.बां.विभाग
निविदा सुचना ( प्रथम फेरनिविदा )

ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील मुंब्रा प्रभाग समिती अंतर्गत रस्त्यांची दुरुस्ती करणेचे कामांकरिता ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत. ज्या कंत्राटदारांविरुध्द शासकीय/ निमशासकीय/ सार्वजनिक क्षेत्रातील संस्था व उपक्रम / स्थानिक स्वराज्य संस्था इ. यांनी शिस्तभंगाचे कार्यवाहिच्या अनुषंगाने नोंदणीपत्र रद्द करण्याची कार्यवाही केली / सुरु आहे, अशा कंत्राटदारांना निविदा प्रक्रियेत भाग घेता येणार नाही. निविदा सुचना ठाणे महानगरपालिकेचे संकेतस्थळ वर दि.१६/०५/ २०२५ ते २३/ ०५ /२०२५ पर्यंत उपलब्ध आहे. ऑनलाईन निविदा महापालिकेचे संकेतस्थळ येथे https ::://mahatenders.gov.in दि.२३/०५/२०२५ रोजी पर्यंत सायं. १६ . ०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील. निविदा दि.२६/०५/२०२५ सायं. १६.०० वाजता निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधी समक्ष उघडण्यात येतील.

ठामपा/पिआरओ/ सा.बा मुं. प्र.स/२३०/२०२५-२६ सही/-
दि.१५.०५.२०२५ कार्यकारी अभियंता
Pls visit our oficial web-site ठाणे महानगरपालिका, ठाणे
www.thanecity.gov.in


# चोरटा जेरबंद; ८ दुचाकी हस्तगत



**ठाणे**: मोटारसायकल चोरी करणाऱ्या हर्षद सुपे (१९) या चोरट्याला ठाणे पोलिसांच्या उल्हासनगर गुन्हे शाखा युनिट-४ ने अटक केली. त्याच्या ताब्यातून ८ मोटारसायकल हस्तगत करण्यात आल्या असून त्यांची किंमत ३ लाख ९० हजार रुपये आहे. तसेच या गुन्ह्यातील विधी संघर्षित बालकाला समजपत्रासह त्याच्या पालकांच्या ताब्यात देण्यात आल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक शैलेश साळवी यांनी दिली.

उल्हास नदीकडे जाणाऱ्या मार्गावर ६ ते ७ इसम चोरीची मोटारसायकल घेऊन फिरत असल्याची माहिती गुन्हे शाखेला मिळाली होती. त्यानुसार १२ मे रोजी सहायक पोलीस उपनिरीक्षक बांडे यांच्या पथकाने सापळा रचून हर्षद सुपे याला संशयित म्हणून ताब्यात घेतले. त्याच्या चौकशीत त्याने आंबिवली येथील अल्पवयीन साथीदाराच्या मदतीने पडघा, कल्याण तालुका पोलीस स्टेशन तसेच वर्तकनगर पोलीस स्टेशन येथे मोटारसायकल चोरी केल्याची कबुली दिली. त्याने दिलेल्या माहितीच्या आधारे ८ मोटारसायकल हस्तगत केल्या आहेत.

पोलीस उपायुक्त (गुन्हे) अमरसिंह जाधव आणि सहाय्यक पोलीस आयुक्त (शोध-१) शेखर बागडे यांच्या मार्गदर्शनाखाली, गुन्हे शाखा युनिट-४, उल्हासनगरचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अशोक कोळी, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक बांडे, सहायक पोलीस उपनिरीक्षक पवार, पोलीस हवालदार थोरवे, गणेश गावडे, योगेश वाघ, मंगेश जाधव, अमर कदम, रितेश वंजारी, पोलीस शिपाई संजय शेरमाले, प्रसाद तोंडलिकर, रामदास उगले आणि अविनाश पवार यांच्या पथकाने सदर कारवाई केली.

# 'नमुंमपा'ची प्रतिबंधात्मक प्लास्टिक विरोधी मोहीम सुरुच

**नवी मुंबई** : नवी मुंबई महापालिकेच्या वतीने महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रतिबंधात्मक प्लास्टिक विरोधी मोहिमा सातत्याने सुरु असून या माध्यमातून एकल वापरातील प्लास्टिक नागरिकांकडून वापरलेच जाऊ नये या दृष्टीने प्रयत्न करण्यात येत आहे.




**प्लास्टिक पिशव्यांची वाहतूक करणाऱ्या टेम्पोवर कारवाई**

या अनुषंगाने परिमंडळ-१ विभागाच्या भरारी पथकाने उपायुक्त सोमनाथ पोटरे यांच्या मार्गदर्शनाखाली सापळा रचून एकल वापरातील प्लास्टिक पिशव्यांची वाहतूक करणाऱ्या छोट्या टेम्पोवर धडक कारवाई केली. यामध्ये आढळलेले ५० किलो वजनाच्या प्लास्टिक पिशव्यांचे गठ्ठे जप्त करण्यात आले. अशाचप्रकारे परिमंडळ-२ चे उपायुक्त डॉ. कैलास गायकवाड यांच्या मार्गदर्शनानुसार परिमंडळ-२ च्या भरारी पथकाला घणसोली, सेक्टर-११ येथील बी-मार्ट मध्ये प्लास्टिक पिशव्यांचा वापर आढळल्याने तेथे उपलब्ध प्लास्टिक पिशव्या जप्त करण्यात आल्या.

त्याचप्रमाणे परिमंडळ-२ च्या भरारी पथकाने ऐरोली, सेक्टर-६ येथील तपासणीत महालक्ष्मी फास्ट फूड या ठिकाणी प्लास्टिक पिशव्यांचा वापर असल्याचे आढळल्याने त्यांच्याकडून दंड वसूल करीत १ किलो प्लास्टिक पिशव्यांचा साठा जप्त केलेला आहे.

प्रतिबंधात्मक प्लास्टिकचा आणि त्यातही प्राधान्याने आढळणारा प्लास्टिक पिशव्यांचा वापर नागरिकांकडून थांबावा याकरिता 'नमुंमपा'च्या वतीने मोठ्या प्रमाणात जनजागृती करण्यात येत असून पर्यायी कापडी व कागदी पिशव्यांचा वापर केला जावा यावर भर देण्यात येत आहे. तसेच प्लास्टिक प्रतिबंधात्मक मोहीमांद्वारेही बाजारात वापरल्या जाणाऱ्या प्रतिबंधात्मक प्लास्टिकवर दंडात्मक कारवाई करुन नियंत्रण आणले जात आहे. त्यामुळे प्लास्टिकमुळे पर्यावरणाला आणि मानवी जीवनाला असलेला धोका लक्षात घेऊन नागरिकांनी प्रतिबंधात्मक प्लास्टिक पिशव्यांचा आणि प्लास्टिक वस्तुंचा वापर पूर्णपणे टाळावा, असे आवाहन नवी मुंबई महापालिकेच्या वतीने करण्यात येत आहे.

# पनवेलमध्ये प्रथमच ३ दिवस आंबा महोत्सव

**पनवेल** : आमदार प्रशांत ठाकूर याच्या संकल्पनेतून भारतीय जनता पार्टी पनवेल शहरच्या वतीने १६ ते १८ मे पर्यंत पनवेलमध्ये प्रथमच आंबा महोत्सव तसेच महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या वाढदिवानिमित्त सांस्कृतिक, मनोरंजन आदि कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.

शहरातील डॉ. पटवर्धन हॉस्पिटल समोरील गुजराती शाळेच्या मैदानावर तीनही दिवस आंबा महोत्सव होणार आहे. या महोत्सव अंतर्गत आज १६ मे सायंकाळी ६ वाजता महिलांसाठी खेळ खेळूया साऱ्याजणी चला जिंकूया अस्सल पैठणी, १७ मे रोजी सायंकाळी ७ वाजता 'अभंग रिपोस्ट' तर १८ मे रोजी संगीत, नृत्य, कलेचा संगम असलेला 'वारसा संस्कृतीचा' असा सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे. या महोत्सवाचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन कार्यक्रम प्रमुख माजी नगरसेविका रुचिता लोंढे, भाजप पनवेल शहर मंडल अध्यक्ष सुमित झुंजारराव यांनी केले आहे.


## जाहीर नोटीस

माझ्या अशिलाच्या वतीने तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे सुचित करण्यात येते की, माझे अशिल यांनी श्री. पवन गणेश गोसावी, व श्री. सरवर हुसेन खान, राहणार. ऑफिस नं. १ आणि २, रहेजा आर्केड, सेक्टर-११, सी.बी.डी. बेलापुर, नवी मुंबई - ४००६१४. यांना सिडको महामंडळाकडून साडे बारा टक्के योजनेनुसार मौजे - उलवे, येथे हस्तांतरण करण्यात आलेल्या भूखंड क्रमांक. २१-ई, सेक्टर-१८, मौजे - उलवे, क्षेत्रफळ ३०० चौ. मी. या भूखंडाचे सर्व हक्क व अधिकार व फायदा कायमस्वरुपी मे. देव इंफ्रा तर्फे भागीदार श्री. धनाजी संपत काटकर व इतर राहणार ऑफिस शॉप नं. १, तळ मजला, श्रीदेवी व्हिला, प्लॉट नं. १९० ई, सेक्टर-२३, उलवे, तालुका पनवेल जिल्हा रायगड - ४१०२०६. यांना हस्तांतरण करण्याचे ठरविलेले आहे.

| अ. क्रं. | ठिकाण | भूखंड क्र. | सेक्टर क्र. | क्षेत्रफळ चौ. मी. |
|---|---|---|---|---|
| १ | उलवे, ता. पनवेल, जि. रायगड. | २१-ई | १८ | ३०० चौ. मी. |

कोणतीही व्यक्ती, व्यक्तीचे किंवा आर्थिक संस्थाचे, भूखंड संदर्भात कुठल्याही प्रकारचा दावा हरकती जसे विक्री, गहाणवट, लोन, भेट, बुकिंग, किंवा अन्य कोणत्याही प्रकारे हक्क असेल तर त्याच्या पुष्टयर्थ त्यांनी अशा हक्काबाबत / हरकतीबाबत ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसाच्या आत दावेशी संबंधीत असलेल्या दस्ताऐवजांची प्रमाणित केलेल्या प्रतीसहीत खालील सही केलेले यांच्या कार्यालयीन पत्त्यावर संपर्क साधावा अन्यथा विक्री, व हस्तांतरणाचे व्यवहार पुर्ण करण्यात येईल त्यानंतर कुठलेही प्रकारचे येणाऱ्या हरकती तक्रारींचा विचार करण्यात येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

**दिनांक** : १६/०५/२०२५
**ठिकाण** : नवी मुंबई

सही/-
**ॲड. सुनिता आर. पाटील,**
शॉप नं. २६, प्रभात सेंटर, सेक्टर-१ ए, सीबीडी बेलापुर, नवी मुंबई.

## PUBLIC NOTICE

THIS is to notify that my Clients i.e. **1) MRS KAMINABEN SURESH PATEL and 2) MRS SHAKUNTALABEN RAJENDRABHAI PATEL** have purchased the **Flat No.202 on the Second Floor in the Building of the KESAR VILLA Co-Operative Housing Society Limited on Plot No.166, situated at Sector-28, Vashi, Navi Mumbai, Tal. & Dist. Thane** (said Flat) from **1) MR JIGAR JASVANTRAI SHAH, 2) MR DHARMESH JASVANTRAI SHAH and 3) MRS URVI JAYNESH SHAH.**

The **Original (i) Allotment Letter, (ii) Payment made Receipts** and **(iii) Possession Letter** all issued/executed by **M/s. PARTH ENTERPRISES, through its Proprietor MR JAYANTILAL M. PATEL,** the Developer in the names of **1) MR JIGAR JASVANTRAI SHAH, 2) MR DHARMESH JASVANTRAI SHAH and 3) MRS URVI JAYNESH SHAH,** in respect of the aforesaid Flat has been lost, misplaced and are not traceable. The online complaint has been lodged with Vashi Police Station, Navi Mumbai on 15th May 2025 and recorded the same under Lost Item Report in Navi Mumbai, having Register ID: wDmY4g1TP8.

Any Person/s, Bank/s, Financial Institution/s, Organization/s, Company/ies or any other Govt. / Concerned Authorities having any right, title, interest, claim, demand etc. against or in the aforesaid Flat by way of aforesaid lost documents and/or by way of inheritance, lien, mortgage, possession, sale, gift, lease, charge, trust, maintenance, development, bequeath, easement, transfer, licence, either agitated in any litigation or otherwise or any other right or interest whatsoever are hereby required to make the same known in writing to the undersigned along with the Original documents pertaining to the claim within a period of Fifteen (15) days from the date of publication hereof.

If no claim is made or received as required hereinabove, my Clients will be at liberty to complete the transaction in respect of the said Flat without any reference or regard to any such purported right, title, claim or interest etc., which shall be deemed to have been waived for all intents and purposes and not binding on my Clients.

Sd/-
**G. V. PATEL & ASSOCIATES**
**Adv. GEETA V. PATEL**
24, Om Rachana CHS, Plot No.3,
Sector-17, Vashi, Navi Mumbai-400703.
Tel: 2235092343, Mob. No.9820883474.
E-mail : gvplawfirm@gmail.com

Date: 16-05-2025
Place: Navi Mumbai.

# संपादकीय

वर्ष - ३२ | अंक - १३

## निवडणूक पूर्वतयारी जोरात!

महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या लांबलेल्या निवडणुका येत्या काही महिन्यांत होण्याची शक्यता आहे. सर्वोच्च न्यायालयाने या निवडणुका घ्यावेत, असे स्पष्ट निर्देश निवडणूक आयोगाला नुकतेच दिले. चार आठवड्यात निवडणुकीची अधिसूचना जारी करावी आणि चार महिन्यात निवडणूक प्रक्रिया पूर्ण करावी, असेही स्पष्ट केल्याने निवडणूक आयोगाकडून निवडणूक घेण्याच्या दृष्टीने हालचाल होणे आश्चर्याचे नाही. त्यामुळे नजिकच्या काही महिन्यात लांबलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होण्याचे संकेत पुरेसे आहेत. तसेच सर्वोच्च न्यायालयाने या निवडणूका घेण्याचे निर्देश देताच राज्यातील राजकीय पक्ष व नेत्यांकडून सुरु असलेल्या हालचाली निवडणूक तसेच अनेक ग्रामपंचायतींच्या सरपंचपदाचे आरक्षण जाहीर होऊ लागले आहे. त्यामुळे यंदाच्या वर्ष अखेरीस स्थानिक स्वराज्य संस्थांच्या लांबलेल्या निवडणुका होत महापालिकांसह नगरपंचायत, जिल्हा परिषदा, नगर परिषदा, पंचायत समित्या, ग्रामपंचायत येथे लोकनियुक्त प्रतिनिधी तसेच महापौर, नगराध्यक्ष, जिल्हा परिषद अध्यक्ष, पंचायत समिती अध्यक्ष, सरपंच मिळतील, हे आता निश्चित आहे.

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लांबल्याने त्या कधी होतील, याबाबतची उत्सुकता राजकीय पक्षांना त्याचबरोबर सामान्य जनांमध्येही याबाबतचे कुतूहल होते. पाच वर्षांपूर्वी कोरोना नावाच्या संसर्गजन्य आजाराने भारतासह जगातील अनेक देशांना फटका दिला; जिवीत हानी, वित्तहानी झाली आणि जे घडले, त्याचे मानवी जीवनाशी निगडीत सर्वच घटकांवर काय परिणाम झाले. हे साऱ्यांनीच पाहिले. मात्र याच आजाराच्या भयाने त्यावेळी महाराष्ट्रातील राजकारणावरही मोठा परिणाम झाला. कोरोना नावाच्या संसर्गजन्य आजार प्रसार होऊ नये यासाठी घेतलेली खबरदारी म्हणून निवडणुका लांबणीवर पडत गेल्या. तसेच दरम्यान राज्यातील राजकीय स्थिती बदलणे, सत्तापालट होणे याचाही परिणाम स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लांबणीवर पडण्यावर झाला, हेही सत्य आहे. मात्र आता त्या निवडणुका लवकर होणार असल्याने आणि आपल्याला नवे प्रतिनिधी मिळणार, हे जनतेला मिळणारे समाधानही महत्वाचे आहे. आता होऊ द्यात निवडणुका, लोकहो बजावा लोकशाहीने दिलेला मतदानाचा हक्क आणि अधिकार!

# वाचकांचे मनोगत

## ऑपरेशन सिंदूर यशस्वी होणे गरजेचे

पहलगाममध्ये आगळीक करून जो रक्तपात केला त्याचा व्याजासहित बदला घेण्याची संधी पाकिस्तानने भारताला दिली होती. आर्थिकदृष्ट्या अपंग पाकिस्तान, पुन्हा आक्रस्ताळेपणे पूंछमध्ये घुसून निघृणपणे आपले नागरिक ठार मारतो तरी भारत करारा जवाब, घुसके मारेंगे/चुन चुन के मारेंगेची सुवर्ण संधी असताना पाकिस्तानचे द्रोण पाडण्याबरोबर पहलगाम,पूंछ मधील निष्पाप नागरिकांची क्रूर हत्या डोळ्यासमोर ठेवून जबरदस्त त्वेषाने अर्धाअधिक पाकिस्तान बेचिराख का करत नाही ? इंदिराजी, अटलजी ह्यांनी जगात भारताचा दरारा कायम ठेवला होता. इंदिरा गांधींनी बांगलादेश निर्माण केला तसा मोदीजींनी बलुचिस्तान स्वतंत्र करायला पाहिजे होता, पीओके ताब्यात घेतला पाहिजे होता. शस्त्रसंधीचे क्रेडिट घेणारे ट्रम्प यांच्या सूचनेला मान्यता देऊन नंतर केराची टोपली दाखवून अपमान केला, त्या मग्रूर पाकिस्तानला दांभिक ट्रम्प धडा शिकवणार काय ? जे बोलतो ते करून दाखवत नाही त्याला मोदी-शहा–राजनाथसिंग-जयशंकर म्हणतात; तर न बोलता भ्याड का होईना, हल्ला करून जीवित हानी, वित्त हानी करतो त्याला आतंकवादी पाकिस्तानी म्हणतात. तिन्ही सैन्य दलाला युद्धासाठी पूर्ण मोकळीक दिली असे मोठ्या फुशारकीने जाहीर केले जाते. त्याची अंमलबजावणी करण्याची क्षमता भारतीय सैन्यामध्ये आहे मग सैन्याचे हात कोणी बांधून ठेवले? पाकिस्तानची कायमची नांगी ठेचून काढण्याच्या प्रतीक्षेत असलेल्या आपल्या सैन्याची इच्छा मारली गेली. केंद्र सरकारने ऑपरेशन सिंदूर नाव देऊन कुंकू पुसल्या गेलेल्या भगिनींना न्याय देणार, अशी अशा पल्लवित केली त्या सिंदूरचा केंद्र सरकारने कच खाऊन अपमान केला. पाकिस्तानला नेस्तनाबुत केले नाही ह्यामागे नक्कीच केन्द्र सरकारच्या अंतर्गत आदेशाची गळचेपी असू शकते. अशा दुष्ट कृतीने सैन्याचे मनोबळ ढासळू शकते. भारताच्या भरवश्यावर बलुचिस्तान नागरिक आनंद साजरा करत होते. आता शस्त्रसंधीनंतर पाकिस्तान बलुचिस्तानची "न घर का न घाटका" अशी अवस्था करू शकतो. रक्तलांछित झालेले पहलगाम, पुंछ व जवानांच्या रक्ताने माखलेल्या जागेची शस्त्रसंधी करून झालेली झीज भरून निघणार आहे काय ? 'ऑपरेशन सिंदूर'ला न्याय मिळाला नाही हे त्या देशाच्या सिंधूंचं अध:पतनच म्हणावे लागेल.

**- यशवंत चव्हाण, सीबीडी-बेलापूर**

## उन्हाळी शिबिरांची उपयुक्तता कितो?

वार्षिक परीक्षा संपून सुट्ट्या सुरू झाल्या की जिकडे तिकडे उन्हाळी शिबिरांची रेलचेल सुरू होते. प्रत्येक ठिकाणी गायन, वादन, नाट्य, अभिनय, नृत्य, साहसी खेळ जसे ट्रेकिंग, स्विमिंग अशा विविध विषयांशी निगडित शिबिरांचे आयोजन केले जाते. पालकही आपल्या मुलांना परीक्षा संपल्या की उन्हाळी शिबिरात दाखल करतात. खरंतर उन्हाळी सुट्टीत मुलांनी मस्त मजा करावी, मित्र मैत्रिणींसोबत मनसोक्त खेळावे, बागडावे, मैदानी खेळ खेळावेत, आवडीची पुस्तके वाचावीत, मामाच्या गावाला किंवा खेडेगावात जाऊन निसर्ग अनुभवावा, गडकिल्ल्यांची भटकंती करावी. पण असे करण्याऐवजी पालक आपल्या मुलांना उन्हाळी शिबीराच्या दावणीला बांधताना मुलांचा कल, आवड पाहत नाहीत. वाढत्या स्पर्धेच्या युगात आपला मुलगा अभ्यासासोबतच इतर कलागुणांमध्येही मागे राहू नये म्हणून पालक आपल्या मुलांना उन्हाळी शिबिरात दाखल करतात. पण ही उन्हाळी शिबिरं आपल्या मुलांसाठी किती उपयुक्त आहेत, या उन्हाळी शिबिरांचा मुलांना खरंच उपयोग होतो का? उन्हाळी शिबिरातील मुलांच्या सुरक्षेबाबत आयोजक गंभीर आहेत का याचाही विचार पालकांनी करावा. तीन वर्षांपूर्वी म्हणजे कोरोनाच्या आधी पुण्यात एका शिबिरात मुळशी धरणात पोहायला गेलेल्या तीन मुलांचा बुडून मृत्यू झाला होता. पालकांनीही आपल्या मुलांना उन्हाळी शिबिरात दाखल करण्यापूर्वी शिबिरातील सुरक्षा व्यवस्थेची, शिबिरांच्या शासनाची मान्यतेची खात्री करायला हवी. सरकारनेही आयोजकांची क्षमता व सुरक्षा व्यवस्थेची पाहणी करूनच अशा शिबिरांना मान्यता द्यायला हवी. शिबिरादरम्यान जर काही दुर्घटना घडली तर त्या दुर्घटनेस आयोजकांनाच जबाबदार धरले पाहिजे. वर्षभर चालणाऱ्या विविध शिबिरातून मुलांना अनेक गोष्टी शिकायला मिळतात. सुट्टीच्या दिवसातील शिबिरांना बऱ्यापैकी पैसे मोजावे लागतात. टीव्ही, मोबाईल, व्हिडीओ गेममध्ये डोके खुपसून बसण्यापेक्षा पैसे जात असले तरी मुले गुंतून राहत असल्यामुळे पालक हाही खर्च सहन करतात. आपल्याला हवे तसे नको तर मुलांना हवे ते देण्याचा, शिकवण्याचा प्रयत्न करावा. एकूणच या शिबिरांची आपल्या मुलांना कितपत गरज आहे याचा विचार करूनच पालकांनी आपल्या मुलांना उन्हाळी शिबिरात दाखल करावे.

**-श्याम ठाणेदार, दौंड, जिल्हा पुणे**

# विवाह सोहळे बदलताहेत?

मागील आठवड्यात एका लग्न समारंभात गेलो होतो. भटजीने मंगल अष्टके सुरु करताना 'स्वस्ति श्री गणनायकं गजमुखम्' हे पहिले व 'कावेरी शरयू महेंद्रतनया' हे दुसरे मंगल अष्टक म्हटले आणि त्यानंतर पुढची सहा सरळ लाऊड स्पिकरवरुन वाजवली गेली. मी चाट पडलो.हा असला अनुभव पहिल्यांदाच घेत होतो. बरं ते लग्न कुणा 'प्रगतीशील विचारवाल्यांच्या' किंवा सगळ्याच जुन्या चालीरीती, परंपरा, आस्था, श्रध्दा झुगारणाऱ्यांच्या घरातीलही नव्हतं. मेट्रोसिटीत नव्हे, तर पार एका दूरस्थ खेडेगावात पार पडत होतं. लग्नाला आलेले अनेक वऱ्हाडी पारंपारिक वेषात आले होते. त्यात वेगवेगळ्या भक्ती संप्रदायातील, भस्म, टिळे, कुंकु कपाळाला लावलेलेही होते. प्रगत, विज्ञानवादी, अंधश्रध्दा निर्मुलनवाले वगैरेंच्या अनेक घरांतील, समाजाच्या विविध स्तरांतील मुला-मुलींच्या विवाहांना मी आवर्जून जात असतो. तेथेही अशी 'कॅसेट वाजवून आरतीफेम' मंगल अष्टके लाऊड स्पीकरवर वाजवून विवाह आटोपल्याचे मी पाहिले नव्हते. उलटपक्षी मी लहानपणापासून पाहात आलो आहे की लग्नप्रसंगीची मंगल अष्टके म्हणताना केवळ भटजीच नव्हे, तर वधूवराच्या नात्यातील काका, मामा, आजोबा अशी ज्येष्ठ नातलग मंडळीही एखाद्दुसरे मंगल अष्टक म्हणतात. यातून काय होते ते मला माहित नाही. पण याचे मूळ हे ज्येष्ठांनी वधूवरांना त्यांच्या दाम्पत्यजीवनासाठी देण्याच्या आशीर्वादात आहे. ही पद्यरचना असुन मराठी तसेच संस्कृतमध्ये असते. आठपैकी प्रत्येक रचना संपल्यावर 'शुभमंगल सावधान' म्हटले की वधूवरांवर फुले तसेच अक्षतांचा वर्षाव करुन आशीर्वाद दिले जातात व या विवाह सोहळ्याच्या माध्यमातून बऱ्याचदा एकमेकांना आधी अजिबातच परिचित नसलेले वधु आणि वर तसेच दोन अनोळखी कुटुंबे आयुष्यभरासाठी एकमेकांसाठीची होऊन जातात. अनेक ठिकाणी पारंपारिक मंगल अष्टकांसोबतच वधु-वर, दोन्ही सोयरी कुटुंबे यांची नावे गुंफुन दोन्ही घराण्यांची वर्णने करणारी स्व-रचित मंगल अष्टकेही म्हटली गेल्याचेही मी स्वत: हजर राहुन ऐकले आहे.



यातील 'शुभमंगल सावधान' हे शब्द मला नेहमीच व्याकुळ करतात. मला मुलगी नाही. त्यामुळे लाडाकोडात वाढवलेल्या आपल्या लेकीची पाठवणी दुसऱ्याच्या घरी करताना त्या जन्मदात्या पित्याला काय वेदना होतात ते मला ठाऊक नाही. मात्र त्या वेदना-संवेदना मी समजू शकतो. मुलगी नसली तरी भाच्या, पुतण्या यांच्या पाठवणीच्या प्रसंगांचा मी साक्षीदार आहे. माझ्या पूर्वजांचे गाव असलेल्या उरणमधील दिवंगत गीतकार अनंत पाटील यांनी लिहिलेले, मधुकर पाठक यांनी संगीतबद्ध केलेले व महाराष्ट्राचे विख्यात लोकगायक दिवंगत प्रल्हाद शिंदे यांनी गायिलेले 'शुभमंगल सावधान..सावधान' हे गाणे माझ्या सदैव स्मरणात राहणारे आहे. या गाण्यात गीतकाराने आपल्या मुलीला सासरी धाडतानाची पित्याची मनस्थिती, त्याची कन्येला समजावणी, लहान कुटुंबाचे महत्व, देशातील महागाई, सावध व चतुर राहण्याची गरज, देशाभिमान, भक्ती या साऱ्यातून त्या मुलीला आशिर्वाद देत आयुष्यभर 'सावधान' राहण्याचा सल्ला दिला आहे. हे गीत मी गेली पन्नास वर्षांहुन अधिक काळ ऐकत आलो आहे. आजही महाराष्ट्राच्या विविध खेड्यापाड्यांत हे गाणे विवाहप्रसंगी हमखास वाजवले जाते. मी माझ्या बालपणीचा मोठा काळ कल्याणमध्ये व्यतीत केला असल्याने कल्याणमध्येच राहणाऱ्या प्रल्हाद शिंदे यांनाही मी विविध प्रसंगी पाहिले आहे. अलिकडे मी पाहतो की अनेक मराठी कुटुंबांच्या विवाह सोहळ्यात पंजाबी गाण्यांनी घुसखोरी तर केली आहेच; त्या गाण्यांवर आणि विवाहाचा कसलाच संदर्भ नसलेल्या तुझी घागर नळाला लाव, पोरी जरा जपून दांडा धर टाईप तद्दन बाजारु, भंपक, आचरट गाण्यांवर मराठी मुले-मुली नाचकाम करीत असतात.



मुशाफिरी
राजेंद्र घरत
ashwaraj2019@gmail.com

मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, रायगड, पालघर या महामुंबईच्या प्रमुख जिल्ह्यांच्या मुळ जमिनमालक, भूधारक, भूमिपुत्र आगरी-कोळी समाजाने त्यांच्या घरचे हळदी व विवाहसमारंभ व त्यानिमित्ताने त्यांनी केलेली आमंत्रित पाहुणेमंडळीची चविष्ट जेवणाची सरबराई आणि आदरातिथ्याच्या माध्यमातून सर्वदूर आपली वेगळी ओळख पोहचवली आहे. स्वाभीमानी, तिखट जेवणाला प्राधान्य देणारा, समोरच्याच्या जीवाला जीव देणारा आणि कुणी दगाफटका केला तर मात्र त्याची दैना करताना मागेपुढे न पाहणारा, कष्टाळू, मेहनती म्हणून आगरी-कोळी समाज परिचित आहे. संघर्ष, मेहनत, कष्ट, परिश्रम हेच एकेकाळी या समाजातील अनेकांच्या नशिबी असे. मग अशावेळी घरातील लग्नसोहळे म्हणजे विविध नातेसंबंधी, मित्रपरिवार, शेजारीपाजारी यांना मंगल कार्यानिमित्त भेटणे, त्यांचे आदरातिथ्य करणे ही एक पर्वणी मानली जाई. या सर्वांचा यथोचित पाहुणचार करणे हे आगरी-कोळ्यांच्या लग्नांमधील एक व्यवच्छेदक लक्षण बनले. कालांतराने परिस्थिती बदलली. वाडवडिलांनी जिवापाड जपून ठेवलेल्या जमिनींना चांगला भाव आला. विविध प्रकल्पांसाठी भूसंपादन केले गेल्यावर पैसे मिळू लागले. मुले-बाळे शिकली. मिळालेल्या, कमावलेल्या पैशांचे चांगले नियोजन केल्याने पैशाने पैसा जोडला गेला व अनेकांची आर्थिक स्थिती बळकट झाली. त्यामुळे त्याचे प्रतिबिंब आगरी-कोळी समाजातील विवाहसमारंभांतून पडले नसते तरच नवल! यात एक गोष्ट मात्र गैर झाली ती ही की या साऱ्यात लग्नाआधीच्या रात्रीच्या हळदीच्या चविष्ट जेवणावळीला दारुपानाची साथ लाभली व केवळ त्यासाठीच अनेक लोक हळदींना आवर्जुन हजेरी लावू लागले. घणसोलीच्या नंदकुमार म्हात्रे यांनी या साऱ्यावर 'मांडवाचे मघारी चाललंय काय?' या नाटकाची निर्मीती करुन प्रबोधनाचा चांगला प्रयत्न केला होता. आजही 'याल तर हसाल' या कार्यक्रमातून संजीवन म्हात्रे यावर प्रबोधनाचे काम करीत आहेत. पण लोक प्रयोगाला येतात, भरपेट हसतात, त्यातील शिकवणुकीचा, तात्पर्याचा भाग पध्दतशीरपणे विसरुन जातात आणि त्यांना करायचे तेच करतात. जेवणाला, भोजनाला, पाहुण्यांच्या आदरातिथ्याला कुणाची हरकत असण्याचे काही कारण नाही. कारण अन्नदानासारखे पवित्र काम दुसरे नाही. पण हळदी-लग्नासारख्या कौटुंबिक आनंदाच्या चांगल्या सोहळ्यात भांडण, शिवीगाळ, कुरापतखोरी याला कारण ठरु शकणारी दारुबाजी नसावी. अनेक हळदीप्रसंगी दारु पिणाऱ्या वऱ्हाड्यांसाठी वेगळी मासळी, सुकामेवा, आम्लेट, मटण, कलेजी असा विशेष जामानिमा; तर हळदीला आलेल्या शाकाहारी वऱ्हाड्यांसाठी मात्र जेमतेम व्यवस्था..जणू काही ते दारु पित नाहीत, मांसाहार करीत नाहीत म्हणजे त्यांनी मोठा गुन्हाच केला आहे, असे वातावरण जे दिसून येते.. ते मात्र योग्य नव्हे!

**ज्या मराठी माणसांनी अनेकांना चव शिकवली, चव दाखवली, चवीचे खायला घातले त्या मराठी माणसांच्या हळदी-लग्नांना आता अनेक ठिकाणी जेवणावळीत काय पाहायला मिळते? तर पनीर टिका, हराभरा कवाब, स्प्रिंग रोल्स, मिनी समोसे, पाणीपुरी, दही पापडी चाट, जिरा राईस, चायनिज राईस, काश्मिरी राईस, नान, रोटी, मटार-पनीर, कुर्मा, छोले, मालपुवा वगैरे वगैरे. मराठी माणसांच्या नोकऱ्यांवर, जमिनींवर, शहरांवर, रस्त्यांवर, फुटपाथवर, बाजारांवर जसे अतिक्रमण झाले आहे तसेच ते आता मराठी माणसांच्या रुढी, परंपरा, हळदी-विवाह सोहळे यातील जेवणावळीवरही झालेय की काय?**

लग्न आगरी-कोळ्यांमधील असो की अन्य कोणत्याही समाजांतील..खेड्यांतील-गावठाणांतील हळदी-लग्नांचा अपवाद वगळता हल्ली अनेक परिवारांतून एकत्र येऊन जेवण रांधणे कमी होत चालले आहे. खेड्यामधील मुबलक जागा, भावकीचे एकत्र येणे, जेवण बनवण्यात, वाढण्यात तरुणाईचा उत्साही सहभाग वगैरे शहरात, महानगरात पाहायला मिळणे कठीण! जागेची मोठीच अडचण त्यामुळे काही लग्नाळूंच्या घराच्या दारात साधा मांडवही पाहायला मिळत नाही. जे काही असेल ते सारे मंगल कार्यालयात...अर्थात हॉलमध्ये. तशात आता एकत्र कुटुंब पध्दती कमी होऊन जिकडे तिकडे विभक्त परिवार पाहायला मिळताहेत. त्यातही अनेक परिवारांतून एकमेकांत इर्षा, ॲटिट्यूड, छुपा संघर्ष, चढाओढ, दाखवेगिरी याही गोष्टींचा शिरकाव होऊन अनेक वर्षे झाली आहेत. त्यामुळे अशा ठिकाणी जेवण मिळणार ते हॉलमधील कॅटरिंगवाल्याच्या सोयीचे. गेल्या दहा-पंधरा वर्षात तर ते ठळकपणे जाणवते. ज्या मराठी माणसांनी अनेकांना चव शिकवली, चव दाखवली, चवीचे खायला घातले.. त्यातील अनेक मराठी माणसांच्या हळदी-लग्नांना आता काय पाहायला मिळते? तर पनीर टिका, हराभरा कवाब, स्प्रिंग रोल्स, मिनी समोसे, पाणीपुरी, दही पापडी चाट, जिरा राईस, चायनिज राईस, काश्मिरी राईस, हैद्राबादी बिर्याणी, नान, रोटी, मटार-पनीर, कुर्मा, छोले, मालपुवा वगैरे वगैरे. मराठी माणसांच्या नोकऱ्यांवर, जमिनींवर, शहरांवर, रस्त्यांवर, फुटपाथवर, बाजारांवर जसे अ-मराठीयांनी अतिक्रमण केले आहे तसेच अतिक्रमण आता मराठी माणसांच्या रुढी, परंपरा, हळदी-विवाह सोहळे यातील जेवणावळीवरही झाले आहे हा त्याचा अर्थ. लग्नप्रसंगी मंगल अष्टके संपल्यावर वधू-वरांनी एकमेकांना हार परिधान करताना त्यांच्या मित्र-नातेवाईकांनी त्यांना उचलून धरत हार घालण्यास अटकाव करणे ही आणखी एक कुप्रथा अलिकडे रुढ झाली आहे. वधूवरांना एकमेकांना आयुष्यभराचे जोडीदार, सोबती लाभावे म्हणून लग्न... की छानछोकीचे फोटो काढले जावेत, शेकडो निमंत्रितांना मंगल कार्यालयात तासन्तास ताटकळत ठेवून किमान पाऊण ते कमाल दीड-दोन तास कपडे बदलण्याच्या नावाखाली वधू वरांना गायब होता व्हावे यासाठी लग्न...असा प्रश्न पडावा अशी अवस्था आता जिकडे तिकडे पाहायला मिळते आहे. एकाच दिवशी वेगवेगळ्या ठिकाणांच्या दोन-तीन विवाहांना जायचे असेल तर वऱ्हाड्यांना अडचणीत टाकणारी ही बाब आहे.

हे असल्या प्रकारचे बदलते विवाह सोहळे तुम्हाला चालतील...की चालवून घेण्याशिवाय गत्यंतरच नाही?

# कोळी समाजाचा लेखाजोखा मांडणारे पुस्तक कोळी समाज

पुस्तक परिक्षण

कोळी समाज या पुस्तकात कोळी समाजाचे सण/उत्सव, सी.आर.झेड. कायद्याचे तसेच खाडीत रासायनिक पाणी सोडल्याचे प्रदुषण, कोकणात औद्योगिक क्षेत्रामुळे झालेले प्रदुषण, खाडीकिनारीची खारफुटी वने, शिवडी न्हावा शेवा पूल आणि दुष्परिणाम, वाशी मानखुर्द चौथा खाडीपूल, समुद्रातील 'रो रो' वाहतूक सेवा, कोस्टल रोड प्रकल्प, समुद्रातील स्मारक प्रकल्प, कोळी बांधवांची मासेमारी, धरमतर खाडी बंदर प्रकल्प, भारतीय नौसेना आणि कोळी समाज, नेव्ही इंजिनिअरिंग संधी, सागरी अभियांत्रिकी शिक्षण, सरकारी मत्स्य व्यवसाय, कोळी समाजाचे भविष्य अशा विषयांचे मंथन या पुस्तकाच्या माध्यमातून झालेले आहे.

पत्रकार/फोटोग्राफर/व्याख्याते सुधाकर लाड यांनी काढलेल्या रायगड किल्ल्याच्या फोटोंचे प्रदर्शन वाशी येथे भरविण्यात आले होते. त्या सर्व फोटोंना दोन काव्य ओळी मी लिहिल्या होत्या. त्या कलासंयोगाने आमची दृढ मैत्री झाली होती. त्यांनी शिवतिर्थ किल्ले रायगड, रायगडचा इंतिहास, ईसा आणि साई ही पुस्तके लिहिली आहेत. त्यानंतर २०२५ साली आलेले त्यांचे 'कोळी समाज' पुस्तक वाचले म्हणजे त्यामागचे कष्ट आपल्या लक्षात येतील. हे ऐतिहासिक/सामाजिक संदर्भ असलेले पुस्तक माझ्या हाती आले आणि मी ते एका दिवसात वाचून काढले. कारण या पुस्तकाने माझ्या वाचक मनाची थेट पकड घेतली.




लाड हे वाणी समाजाचे आहेत. तरी त्यांनी कोळी समाज हे अभ्यासपूर्ण पुस्तक अथक परिश्रमाने लिहिले आहे. लाड हे बालपणापासून पनवेल परिसरातील आगरी/कोळी समाजातील लोकांसोबत वावरलेले आहेत. पनवेल/उरण/अलिबाग भागातील अनेक गावांत ते फिरलेले आहेत. एकदा ते खोल समुद्रात बोटीवरची मासेमारी बघण्यास पाच सहा दिवसांच्या समुद्र सफरीवर गेले होते. आगरी/कोळी समाजाचे सण-उत्सव, देव धर्म, लग्न-जत्रा, रितीरिवाज त्यांनी जवळून पाहिले आहेत. प्रदीर्घ पत्रकारिता, गावोगावी भ्रमंती केल्याने अगदी तळमळीने त्यांनी हे पन्नास प्रकरणांचे महत्वपूर्ण पुस्तक लिहिले आहे.

सोळाव्या शतकातील शिवाजी महाराजांचा काळ, सतराव्या शतकातील पेशव्यांचा काळ, अठराव्या शतकातील इंग्रजांचा काळ या पुस्तकात आला आहे. एखाद्या उत्खनन करणा-या संशोधकाप्रमाणे त्यांनी माहिती खोदून काढली आहे. म्हणूनच हे पुस्तक वाचनीय झाले आहे. या पुस्तकास व्याख्याते राजाराम पाटील यांची प्रस्तावना लाभली आहे. ते म्हणतात 'या पुस्तकात आजवर कुठेही न आलेली सखोल माहिती आली आहे.' या पुस्तकाचे लेखक लाड म्हणतात 'छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्यासाठी योगदान देणारा आद्य भूमिपुत्र कोळी समाज या पुस्तकाच्या लेखनाने मला वेगळाच आनंद दिला.' आपल्या पहिल्याच प्रकरणात 'महाकवी महर्षी वाल्मिक ऋषी' हे जन्माने कोळी होते. याबाबत ते भाष्य करतात. 'वाल्मिक कोळी हा तरूण वयात लुटारू होता' ही वदंता लाड यांनी खोडून काढली आहे. त्यांच्या मते ते पुराणपूर्व काळातील राजे होते. त्यांची बदनामी थांबावी असे म्हटले आहे. दुस-या प्रकरणात महर्षी व्यास मुनींचा विषय आला आहे. व्यासांची आई ही कोळीण होती. त्या अर्थाने तेही कोळी संस्कारात वाढलेले होते. तिस-या प्रकरणात विठ्ठलभक्त पुंडलिकाचा उहापोह आहे. ते जन्माने कोळी होते. श्री विठ्ठलाच्या कानात जी मस्यरूपी कुंडले आहेत ती कोळ्यांच्या भक्तीची रूपे आहेत.

**गज आनन म्हात्रे**
**कवी-लेखक/नाटककार**

चौथ्या प्रकरणात तथागत गौतम बुध्दाबाबत विवेचन आहे. बुध्दांचा जन्म क्षत्रिय सुर्यवंशी कोळी वंशात झाला. पाचव्या प्रकरणात 'कोल वंशाचा' शोध घेतला आहे. पुढच्याच प्रकरणात 'बलुतेदार कोळी' समाजाचा धांडोळा घेतला आहे. त्या पुढच्या प्रकरणात जंजिरा किल्ल्याचा आद्य किल्लेदार राम कोळी याचा इंतिहास सांगितला आहे. पुढील प्रकरणात शिवाजी महाराजांच्या आरमारात कोळी समाजाचे लोक नोकरीत होते, ते कथन केले आहे. पुस्तकात पुढे झलकारी बाई कोरी (कोळी) या विरांगणेची माहिती आली आहे. पुढे महादेव कोळी समाजाचे 'क्रांतिकारक राघोजी रामजी भांगरे' यांची माहिती आली आहे. पुढे 'स्वामी समर्थ शिष्य पांडुबुवा नाखवा' यांची माहिती आली आहे. पुढे माजी खासदार 'भाऊसाहेब राऊत' यांच्या समाजकार्याची माहिती आली आहे. कोळी समाजातील महनिय व्यक्तींची दुर्मिळ माहिती या पुस्तकाच्या माध्यमातून आपणास मिळते. त्यानंतर या पुस्तकात कोळी समाजाचे सण/उत्सव, सी.आर.झेड. कायद्याचे दुष्परिणाम, खाडीत रासायनिक पाणी सोडल्याचे प्रदुषण, नद्या दूषित केल्याचे परिणाम, कोकणात औद्योगिक क्षेत्रामुळे झालेले प्रदुषण, खाडीकिनारीची खारफुटी वने, शिवडी न्हावा शेवा पूल आणि दुष्परिणाम, वाशी मानखुर्द चौथा खाडीपूल, समुद्रातील 'रो रो' वाहतूक सेवा, कोस्टल रोड प्रकल्प, समुद्रातील स्मारक प्रकल्प, कोळी बांधवांची मासेमारी, धरमतर खाडी बंदर प्रकल्प, मुंबईची मिठी नदी, शहरानजीकच्या पाणथळ जागा, भारतीय नौसेना आणि कोळी समाज, नेव्ही इंजिनिअरिंग संधी, सागरी अभियांत्रिकी शिक्षण, सरकारी मस्त्य व्यवसाय, कोळी समाजाचे भविष्य अशा विषयांचे मंथन या पुस्तकाच्या माध्यमातून झालेले आहे. हे पुस्तक वाचले म्हणजे त्यामागचे कष्ट आपल्या लक्षात येतील.

'कोळी समाज' ह्या पुस्तकाचे सुंदर मुखपृष्ठ, छान छपाई, माहितीपर सदरे, दुर्मिळ इंतिहास, माहितीचे संकलन या जमेच्या बाजू आहेत. राजकारणी, समाजकारणी, पत्रकार, सामाजिक संस्था, मित्र मंडळे, महिला मंडळे यांच्या संग्रही ठेवण्याजोगे हे पुस्तक आहे. शाळा, कॉलेज, ग्रंथालये, वाचनालये यांनी हे पुस्तक आवर्जून घ्यावे असेच आहे. या पुस्तकासाठी संपर्क - सुधाकर लाड : ९२२४२३२९६३

**लेखक - सुधाकर लाड भैरी भवानी**
**प्रकाशन पनवेल**
**पृष्ठे - २४६, किंमत - रु. ४००/-**

# कान गोष्टी...

सुखी संसाराला कुणाची नजर नको गं बाई लागायला... असं आईनं म्हटलं नि नेहमीप्रमाणे सुनिता हसली. अगं आई, आमच्या संसाराला कशाला कुणाची नजर लागेल? चांगली पंचवीस वर्ष झाली आता. आमची मुलंसुद्धा शिकूनसवरुन नोकरीला लागलीत. सुधीरचा बिझनेस आणि माझं समाजकार्य व्यवस्थित चाललंय. कशाची म्हणून ददात नाही. तुझं आपलं काही तरीच हं ! असं बोलून सुनिता बाहेर पडली.

सुनिता बाहेर पडून गेली नि आई विचार करत बसली. आपल्या मनात असं कां बरं येतं नेहमी? अतिशय लाडाकोडात वाढलेली आपली एकुलती एक लेक कधी मोठी झाली ते कळलं सुध्दा नाही. सुधीरशी लग्न झालं... दोन मुलं झाली. बोलता बोलता तीसुद्धा मोठी होऊन नोकरी धंद्याला लागली. सारं कसं छान चाललंय. असं असताना का कोण जाणे अधुनमधून माझं मन असं का बरं घाबरतं? मध्यंतरी सुनिताच्या सामाजिक कार्याचं सगळीकडे कौतुक चालू असतानाच 'ती' गोष्ट कानावर आली आणि घाबरलेच मी. एका आमदार पुत्राच्या बरोबर तिचं नाव जोडलं जाऊ लागलं नि मीसुद्धा त्यावर विश्वास ठेवला...कसलीच शहानिशा न करता !



जेव्हा आपलं नाणं खणखणीत असतं तेव्हा अशा कान गोष्टींवर विश्वास ठेवायचा नसतो. पण मला ते सुचलं नाही. आपल्या मुलीपेक्षा इतरांचं बोलणं, अफवा आपल्याला खऱ्या वाटल्या आणि आडून आडून आपणच तिला सांगत राहिलो. खरं तर स्पष्ट बोलून विषय संपवता आला असता. पण... तेवढं धैर्य झालं नाही हेच खरं.

**विलास समेळ**

आपला जावई तर लाखात एक! सुनिताचे वडील गेल्यावर त्यांनीच आपल्याला गावाहून इथं आणून कायमसाठी ठेवलं. एवढं सारं असूनही एका छोट्याशा बातमीने सारं रामायण घडलं.

सुनितालाही आईचं हे बोलणं खटकायचं. समाजकार्य करताना अनेकांशी संबंध येतातच पण आपण, सुधीर आणि आपली मुलं यांच्यावर भरभरून प्रेम करताना नि संसारात काहीच कमी नसताना कशाला कुणाची नजर लागेल? शेवटी एकदा तिने आईला स्पष्टच विचारलं आणि आईनेही ती असं का बोलते ते सांगितल्यावर मात्र सुनिताला हसावं की रडावं तेच कळेना. ती एवढंच म्हणाली..आई, कानावर आलेली प्रत्येक गोष्ट खरी असतेच असं नाही. रिकामटेकडी लोकं अशा कान गोष्टी करतच असतात. त्यावर कधीच विश्वास ठेऊ नये. आपल्या लेकीपेक्षा बाहेरच्या लोकांचं बोलणं तुला खरं वाटलं ? अशामुळे गैरसमज वाढतात नि नाती तुटतात.

अशा गोष्टींकडे 'कानाडोळा' करायला शिकलं पाहिजे. अशाप्रकारे विनाकारण उरलेलं संशयाचं वादळ शमलं आणि सारं छान झालं.

तात्पर्य : खात्री केल्याशिवाय कोणी काहीही सांगितलं तरी त्यावर विश्वास ठेवू नये.

नवे शहर — आपलं नवे शहर वाचक संवाद! आम्हालाही काही सांगायचंय !!

# ऑपरेशन सिंदूर हे नाव ट्रेडमार्क म्हणून मनोरंजन व व्यापारी वापराला परवानगी देणे कितपत योग्य?



## काय हरकत आहे?

ऑपरेशन शिंदूर या नावाच्या मोहिमेअंतर्गत ट्रेडमार्क म्हणून मनोरंजन आणि व्यापारी वापराला पेन्टन्ट म्हणून घेण्यास काहीच हरकत नाही किंवा काहीही गैर नाही. मुळात 'शिवाजी बीडी', 'संभाजी बीडी' 'छत्रपती बीडी' या तंबाखू औद्योगिक उत्पादनला कोणीही आवाहन दिलेले आठवत नाही आणि संपूर्ण देशाचे व जगाचे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या बाबत आदर म्हणून तंबाखू उत्पादनाने आपला व्यवसाय थांबविला नाही किंवा उत्पादनाकडे व्यसन म्हणून पाहिले नाही; तर नागरिकाचे उदरनिर्वाहाचे साधन म्हणून व्यापार पाहिले असावे. त्या दृष्टिकोनातून ऑपरेशन सिंदूर या नावाकडे (ट्रेड मार्ककडे) देखील व्यापार म्हणून एक उदरनिर्वाहाचे साधन म्हणून पाहण्यास काय हरकत आहे?

**-रामचंद्र भोसले, ठाणे.**



## 'ऑपरेशन सिंदूर' चा ट्रेडमार्क नको

पहलगाम हल्ल्याचा बदला घेण्यासाठी भारतीय सैन्याने राबवलेल्या 'ऑपरेशन सिंदूर' या मोहिमेच्या नावाचा काही चित्रपट व मालिका निर्माते तसेच काही उद्योजक यांनी 'ऑपरेशन सिंदूर' चा ट्रेडमार्क वापरासाठी अर्ज केले आहेत. ही कारवाई कोट्यवधी भारतीयांच्या भावनांशी जुळलेली आहे. या कारवाईत अनेक भगिनींचे कुंकू पुसले गेले. अनेक कुटुंबे निराधार झाली आहेत. त्यानंतर भारतीय सैन्य दलाने पाकिस्तानातील दहशतवाद्यांची ठिकाणे उध्वस्त करून पाकिस्तानला धडा शिकवला. सर्व सामान्यांच्या भावनांचा तसेच आपल्या सैन्याच्या शौर्याचा स्वार्थासाठी बाजार मांडणे अयोग्य असल्याने 'ऑपरेशन सिंदूर' चा ट्रेडमार्क म्हणून वापर करण्यास परवानगी देऊ नये.

**-बकुल बोरकर, विले पार्ले.**



## ऑपरेशन सिंदूर नावाचा धंदा करू देऊ नये

आतापर्यंत ऐतिहासिक आणि वर्तमानातील घटनांवर अनेक चित्रपट बनवले गेले.. कारण चित्रपट हे केवळ मनोरंजनाचेच साधन नाही, तर चित्रपटांमुळे जनजागृतीही चांगली होऊ शकते. अलिकडील काही वर्षात 'उरी', 'काश्मीर फाइल्स', 'केरला स्टोरी', 'वॅक्सिन वॉर', 'आर्टीकल ३७०' असे काही चांगले चित्रपट आले. छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवनावर हल्लीच प्रदर्शित झालेल्या 'छावा' चित्रपटाने सारे रेकॉर्ड तोडले. मग आता कुणी 'ऑपरेशन सिंदूर' या घटनेवर चित्रपट करू पहात असेल तर त्यात चूक नाही. चित्रपटाच्या माध्यमातून पुढील पिढीला इतिहास ज्ञात होऊ शकतो; पण असे ऐतिहासिक चित्रपट बनवताना बरेच स्वत:ला सेक्युलर समजणारे इतिहासाची वाट्टेल तशी मोडतोड करतात, बलात्कारी, खूनी वा घरांना आगी लावणारे अब्दुल, अन्सारी वा मौलवी असतील तर त्यांची नावे बदलून अमर, गंगाराम वा मंदिरातील पुजारी दाखवतात. याला कुणी आक्षेप घेतला तर 'तो चित्रपट आहे, मनोरंजन म्हणून पहा, प्रत्येक ठिकाणी धर्म आणू नका' असा सल्ला निर्लज्ज धर्मांध देतात. ढोंगी सेक्युलरांच्या अशा चित्रपटांना मंजुरी देता नये. वास्तू, ग्रंथ, छायाचित्रे आणि चित्रपट - नाटक अशा कलाकृतींद्वारे इतिहासाचे जतन होत असते. त्यामुळे चुकीचा इतिहास चित्रीत होता नये याची दक्षता घेतली पाहिजे. असे असले तरी तेच नाव कुणी बिझनेसवाला अन्य वस्तूला देऊन धंदा करू पहात असेल तर ती चूक ठरेल. जेव्हा एखाद्या घटनेवर चित्रपट/नाटक निर्माण होते तेव्हा त्यात ती घटना चितारलेली असते, त्या घटनेची माहिती आताच्या पिढीला व पुढच्या पिढ्यांना मिळावी हा उद्देश असतो. कोणत्याही वस्तूला तसे नाव दिले तर त्यात तसा उद्देश नसतो, तो व्यापारी फक्त त्या नावावर आपला धंदा करत असतो हा फरक लक्षात घ्यायला हवा.

# आनंदी प्रसंगांचा साक्षीदार केक नको, टरबूज (कलिंगड) असावा

**लग्न समारंभात अलिकडे केक कापले जातात. घरातील वाढदिवस, लग्नाचा वर्धापन (वाढदिवस) दिन साजरा करतानाही केक जणू आवश्यकच! मात्र ह्या सेलिब्रेशनमध्ये असेही आढळून येत आहे की, केक कोणी जास्त खात नसल्यामुळे त्याची नासाडी होते व नाहक आर्थिक नुकसान होत असते. आता गरज आहे ह्या केकला पर्याय शोधण्याची. भूतकाळात बघितले तर भारतीय संस्कृतीत कुठेही सेलिब्रेशनसाठी केक वापरल्याचे आढळत नाही. मग ह्याला पर्याय काय? तर आपल्या नजरेसमोर येतं ते म्हणजे टरबूज (कलिंगड).**

**अरविंद सं. मोरे**

सध्याचे युग हे सिलेब्रेशनचे युग आहे. कुठलीही आनंदी घटना घडली की लगेच सर्वांचा एकाच सूर निघतो तो म्हणजे सेलिब्रेट करूया. पार्टी पाहिजे. मग तो वाढदिवस असो, परीक्षा पास झालेला असो, नौकरी लागलेली असो, साखरपुडा असो, पदोन्नती असो, लग्नाचा वाढदिवस असो की एखादे टार्गेट पूर्ण केल्याचा क्षण असो आणि हे सर्व क्षण हल्ली एकाच गोष्टी सोबत साजरे केले जातात तो म्हणजे 'केक'.

केकची एव्हढी क्रेझ आहे की विचारू नका. काही झाले की केक कापा. बरं,



केक कापा, केक खा इथपर्यंत ठीक आहे. त्यापुढे प्रकार असतो तो म्हणजे केक तोंडाला फासणे. त्याचे फोटो काढणे. हे सर्व भूषणावह वाटणे आणि समाज माध्यमांवर टाकणे. एकदा का हे फोटो समाज माध्यमांवर गेले की झाले सर्वचजण धन्य! हे आपण का करतो? कशासाठी करतो? हे आपल्याला काही माहित नाही. सर्व करतात म्हणून आपण करतो. ह्याला कुठलाही आधार नाही. बरं हे सर्व लहानापासून तर मोठ्यापर्यंत सर्वच करतात. बरं हल्ली बऱ्याच जणांना साखर असते म्हणून ते केक खाऊ शकत नाही. जस्ट नावाला तुकडा तोंडाला लावतात. खाल्लं की नाही खाल्यासारखं करतात. कोणी तर कॅन्सरच्या भीतीनेसुद्धा केक खात नाही. केक खाण्याचा सुद्धा पूर्ण आनंद घेऊन शकत नाही. ह्यात दुसरा प्रकार केकमध्ये क्रीम खूप आहे आम्ही खाणार नाही. तिसरा प्रकार केकमूळे वजन वाढत म्हणून खाणार नाही आणि चौथा टप्पा हा की केकमध्ये अंडे आहे म्हणून खाणार नाही. म्हणजे ह्या केकच्या सेलिब्रेशनला ह्या चार दिव्य परीक्षांतून जावं लागत. तरी एव्हढं फॅड आहे की सेलिब्रेशनसाठी केकच पाहिजे. कशासाठी केकचा एवढा आग्रह ? असं काय एव्हढं आपलं घोड अडतंय ते ?

सर्व करतात म्हणून आपण करतो. लॉजिक मात्र काहीच नाही. तर्क मात्र काहीच नाही. फक्त परंपरा पडली म्हणून आपण करतो आहे.

एक साधारणत: चार दशकापूर्वीचा काळ होता, त्या वेळेस मे महिन्यात लग्न समारंभ आयोजित केले जात असत. कारण हे असे की, १ मे नंतर सर्व शाळा, महाविद्यालयांना सुट्टी असे व ह्या शाळा, लग्न समारंभासाठी उपलब्ध असतात. त्यावेळेस सध्या सारखे हॉल उपलब्ध नव्हते व सध्यासारख्या सुखसोयीसुद्धा नसत व कुटुंबाची ऐपतसुद्धा नसे. सर्वजण सर्वसामान्यच असायचे. आता ह्या सर्व चार दशकापूर्वी झालेल्या लग्न समारोहाचे मोठ्या प्रमाणात लग्नाचा वर्धापन (वाढदिवस) दिन साजरा केला जात आहे आणि हे सर्व लग्न वर्धापन दिन केक कापून साजरा केला जात आहे.

ह्या सेलिब्रेशनमध्ये असे आढळून येत आहे की, केक हा पदार्थ कोणी जास्त खात नसल्यामुळे त्याची नासाडी होत आहे व नाहक आर्थिक नुकसान होऊन समारोह साजरा केल्याचे समाधानही मिळत नाही. आता गरज आहे ह्या केकला पर्याय शोधण्याचा भूतकाळात बघितले तर भारतीय संस्कृतीत कुठेही सेलिब्रेशनसाठी केक वापरल्याचे आढळत नाही. मग ह्याला पर्याय काय? तर आपल्या नजरेसमोर येतं ते म्हणजे टरबूज (कलिंगड). हे चवीसाठी गोड, सर्वांना स्वाद घेता येईल असे, दिसायला मोठे आणि खिशाला परवडेल असे आहे. ह्या फळाला बऱ्यापैकी पसंदीसुद्धा आहे आणि हल्ली हे बारमाहीसुद्धा उपलब्ध आहे. तसेच हे सर्वत्र उपलब्ध सुद्धा आहे. आकाराने मोठे असल्यामुळे फोटोसुद्धा छान, ठळक दिसतात व संपूर्ण कुटुंबाची गरज भागेल एव्हढेसुद्धा असते.

एक नजर टरबूज वर टाकूया की 'सेलेब्रेशन'साठी हे कसे योग्य राहील! टरबूज उर्फ कलिंगड हे एक मोठे, हिरव्या रंगाचे, लाल, पाणीदार गोड गर असणारे फळ आहे. ह्याचे शास्त्रीय नाव 'सिटरुलस लेनेटस' असे आहे. साधारणत: हे फळ उन्हाळ्यात अधिक मिळतं आणि पसंद केलं जातं. कलिंगड गुणाने अत्यंत शीत असून ते एक उत्तम टॉनिकसुद्धा आहे. हे खूप रुची देणारे आणि शरीरातील लघवीचे प्रमाण वाढविणारे फळ आहे. जर आपण ह्या फळाला पसंदी दिली तर फळाचे उत्पादन वाढून शेतकऱ्यांच्या समृद्धीसाठी मदत होऊन आपल्या देशाच्या उत्पादनाच्या वाढीला मदत होईल व देशाचे उत्पन्नपण वाढेल.

सुमारे ५००० वर्षांपूर्वी आफ्रिकेत पहिल्यांदा टरबूज पिकवण्यात आले यानंतर ते हळूहळू इजिप्त आणि ग्रीस मार्गे भारतात पोहोचले. इजिप्शियन पिरॅमिडमध्येही टरबुजाचे अवशेष सापडले आहेत. टरबूजमध्ये ९०टक्के पेक्षा जास्त पाणी असते, जे शरीराला हायड्रेट करते म्हणूनच टरबुजाला 'उन्हाळी सुपरफूड' असेही म्हणतात. टरबूजमध्ये जीवनसत्वे आणि खनिजे भरपूर असतात. यामुळे हृदयाचे आरोग्य सुधारते, वजन नियंत्रणात राहते आणि पचनसंस्थादेखील मजबूत होते. १०० ग्राम टरबूजमध्ये अंदाजे ३० कॅलरीज असतात. टरबूज हे जीवनसत्वे आणि खनिजांचा एक उत्कृष्ट स्त्रोत आहे. यामध्ये व्हिटॅमिन सी, व्हिटॅमिन ए आणि पोटॅशियम भरपूर प्रमाणात असते. टरबूज खाण्याचे अनेक आरोग्यदायक फायदे आहेत. उन्हाळ्यात ते शरीराचे तापमान सामान्य ठेवण्यास मदत करते. त्यामुळे रोगप्रतिकारक शक्ती वाढते आणि त्वचेचे आरोग्यदेखील सुधारते. टरबूजमध्ये मुबलक प्रमाणात व्हिटॅमिन सी असते. यामुळे रोगप्रतिकारक शक्ती मजबूत होते. हे शरीराला संसर्ग आणि रोगांशी लढण्यास मदत करते आणि कर्करोगासारख्या आजारांचा धोका देखील कमी करू शकते. व्हिटॅमिन ए आपल्या डोळ्यांसाठी खूप महत्वाचे आहे. म्हणून टरबूज खाल्याने डोळे निरोगी राहतात आणि दृष्टी कमकुवत होण्याचा धोका कमी होतो. टरबूजमध्ये जीवनसत्वे अ, ब ६ आणि क असतात. हे सर्व जीवनसत्वे त्वचा मऊ आणि चमकदार ठेवतात. टरबूज पचण्यास सोपे असते जे अन्न पचवण्यास मदत करतात म्हणून टरबूज खाल्याने पचनसंस्था मजबूत होते.

हे एव्हढे समृद्ध आणि गुणसंपन्न व आरोग्यवर्धक फळ असल्यावर त्याचा उपयोग आपल्या सेलिब्रेशन व स्वास्थासाठी करायला काही दुमत असायला नको. अगदी आपण त्याचा आनंदाने स्वीकार करायला पाहिजे व प्रत्येक सेलिब्रेशन टरबूज (कलिंगड) सोबतच करायला पाहिजे. टरबूज हे सर्वानाच आवडतं. अगदी सामान्यांपासून तर सेलिब्रिटीज पर्यंत! म्हणून तर काही चित्रपटामध्ये ह्याचे हिरो हिरोईन सोबतचे सिन्स आढळतात. मग तो 'गजनी' असो की 'दिल है की मानता नहीं' असो; ह्यात मोठ्या मनोरंजकपणे नट आणि नटीचे प्रेम व्यक्त करण्याचे सिन्स आढळतात.

टरबूज हे फळ सर्वांना हवे, हवे असणारे आहे. म्हणून त्याला केकचा सर्वोत्तम पर्याय निवडून सेलिब्रेशनसाठी निवड करायला काय हरकत आहे ? हा बदल नक्कीच 'दिल है की मानता नहीं'असे होईल; पण आपल्या दिलाच्या स्वास्थासाठी आपल्याला आपल्या दिलाला राजी करावे लागेल आणि तो नक्कीच टरबुजासाठी राजी होईल. तरच (टरच) आपले शरीर बुजासारखे १०० वर्षे उभे राहील.

# मी आणि माझं घर



भिंत होऊन, छप्पर होऊन,  
गुप्तता राखी, छिद्रं झाकली;  
पणती, वात, तेल होऊन  
कोनेकोपरे उजळून टाकले.  
सून झाले, बायको झाले,  
आई झाले, सासू झाले,  
माझी मला हरवून बसले.  
आता सोंगे पुरे झाली;  
सारी ओझी जड झाली.  
उतरून ठेवून आता तरी  
माझी मला शोधू दे;  
तुकडे तुकडे जावू दे.  
विशाल काही पुजू दे.  
मोकळा श्वास घेऊ दे.  
श्वास दिला, त्याचा ध्यास  
घेत घेत जाऊ दे!  
-इंदिरा संत

**शुभांगी पासेबंद**

माझं घर हे खूप गोड संकल्पना असते मी आणि माझं घर या दोनच गोष्टीत पूर्ण विश्वदेखील सामावलं जाऊ शकते.

खूप दमल्यावर विश्रांती घेण्यासाठी निदान उगीचच वेळ काढण्यासाठी आउट घटकेचं निवासस्थान हवं असतं. ते मिळावं म्हणून माणूस जीवाचा आटापिटा अनेक वर्ष करतो. चोखंदळपणे अनेक घरं बघतो. अनेक व्रतं करतो. फुलपाखरू ज्याप्रमाणे अनेक मुलांना नाक मुरडत मुरडत हुंगीत जातो, तशी ही माणसाची घर बघण्याची चळवळ कायम असते. स्वत:चं घर हवं ही एक आदिम प्रेरणा आहे. पक्षी झाडांवर घरटी बांधतात जनावर कानाकपारीत गुहेमध्ये कुठेतरी आपलं गृह स्वप्न पूर्ण करतात. घर म्हणजे फक्त एक चार भिंतींची निवारा ठेवण्याची जागा नसते. त्याच्यात माणसाची आपुलकी बांधलेली असते. त्यामुळे नवीन घर खरेदी हे माणसाचं नेहमीच स्वप्न असतं.

सहज खेळकरपणे घर घेणं शक्य नसतं. खूप मेहनतच करावी लागते. उन्हाळ्यात उन्हाने घाबराघुबरा होणारा जीव सुगंधाने सुखावतो. तसं खूप त्रास झालेल्या माणसाला जसं सुगंधी झुळूक शांतता देते, तसं घरी आल्यावर बरं वाटतं. त्या घराबाबत एक दुसरे वैशिष्ट्य असं असतं की सोबत म्हणून माणूस हवा असतो. निर्विकार वात्सल्य नसतं. घरासाठी केलेल्या कष्टांनी, घराच्या भेटी तात्पुरत्या उडत्या अल्पकाळाच्यासुद्धा फुलून आलेल्या असतात. त्या त्या वास्तूचा गुण असतो सहज भेटलेली वास्तूसुद्धा कधी कधी आयुष्यभर आठवत राहते. घर खरेदीचा विडा उचलला की घर खरेदी करणे हा डोंगर चढताना सोपा वाटतो. उतरताना अवघड वाटतं. निळे हिरवे सुंदर दिसणारे डोंगर सर्व छटा त्याच्यात मिसळलेल्या असतात. पण पैसे भरताना आणि हप्ते फिटताना मात्र त्रास होतो. निळ्या रंगाच सौम्य आवरण घेतलेला पर्वत उतरावादेखील लागतो. काही कारणाने स्वप्न पूर्ण होत नाही. काही कारणांनी घर वास्तू जागा सोडून जायची वेळ आली ना, तरी तो गृह वसा विकणेसुद्धा अवघड असतं. घर पहावं बांधून, तस घर पहावं विकून, असंदेखील असतं.

काही दिवस राहिल्यावर हे एकेकाळी स्वप्नवत असलेले घरदेखील माणसाला अडगळ वाटू लागतं. कारण त्याच्या नवेपण रहात नाही. ते घर आधुनिक राहत नाही. काही घरांमध्ये सर्वच काही सौम्य असतं. तर काही घरी ते दुभंग असतं. म्हणजे दोन टोकाचं असू शकते. तो पण वास्तुदोष असू शकतो. शांत अशांत याचा मिलाफ असू शकतो.

हे घर घेतल्यावरसुद्धा ते घर सगळ्यांचं असतं; पण ते घर गृहिणीचा अधिक प्रमाणात असतं. गृहिणीची स्वप्नं त्या घरात असतात. महिला संवेदनशील असल्यामुळे घराशी जास्ती बांधीलकी त्यांची असते. तुकडे तुकडे जमून तिने तो संसार मांडलेला असतो. ते घर बनवलेलं असतं. चार भिंती विकत मिळतात. पण त्याला घर बनवते. गृहिणी गृहखरेदीत मोठा वाटा महिलांचा असतो आणि काही कारणाने घर सोडून जावं लागलं तर जखमी होणारीदेखील महिलाच असते. तिने घराचा कानाकोपरा उजळून टाकलेला असतो. त्या घरातील मी स्वत:ला हरवून नवं काही घडवलेलं असतं. नवीन घर घेताना महिला विचार करते मी मज हरपून बसले रे!

मी आणि माझं स्वत: स्वतंत्र आणि सुंदर सोयीस्कर घर असावं, हे स्वप्न माणसाचं नेहमीच असतं. सणवाराला, पाडव्याला, अक्षय तृतीयेला अथवा एरवीही नवीन खरेदी करायचा सुमुहूर्त समोर असतो.

चला तर वाट कसली बघताय? मी आणि माझं घर असं स्वप्न पूर्ण करू या!

भाग-२

# गुणाकाराच्या सोप्या पध्दती

**गुणाकार शिकवताना शिक्षकांनी विविध पध्दती वापरुन विद्यार्थ्यांच्या क्षमतेनुसार मार्गदर्शन करणे गरजेचे आहे. एकाच पद्धतीवर भर न देता प्रत्येकासाठी उपयुक्त ठरेल अशी विविधता ठेवली तर विद्यार्थ्यांना संकल्पना अधिक स्पष्ट आणि सोपी वाटेल. सराव, खेळ, उदाहरणे आणि छोट्या युक्त्या यांचा वापर करून गुणाकारासारखी मूलभूत क्रिया देखील विद्यार्थ्यांसाठी रंजक, सुलभ आणि समजण्यासारखी ठरु शकते.**

**शेखर शांताराम जगताप**  
**शिक्षण प्रसारक विद्यालय, नेरूळ, नवी मुंबई.**


गणित विद्यार्थ्यांसाठी एक महत्त्वाचे आणि मूलभूत विषय आहे. गणितातील मूलभूत ४ क्रिया म्हणजे बेरीज, वजाबाकी, गुणाकार आणि भागाकार. यामध्ये गुणाकार एक महत्त्वाची क्रिया असून ती सर्व गणिती प्रक्रियांचे मूळ आहे. विशेषत: शालेय विद्यार्थ्यांसाठी गुणाकार समजून घेणे गरजेचे असते, कारण हाच पाया पुढे अंकीय गणित, बीजगणित आणि भूमितीत उपयोगी ठरतो.

अनेक विद्यार्थ्यांना गुणाकार कठीण वाटतो. कारण त्यात मोठ्या संख्यांची गरज असते आणि त्याचा सराव नसेल तर चुका होण्याची शक्यता असते. परंतु, काही सोप्या पध्दती वापरुन गुणाकार सहज समजून घेता येतो. या लेखात आपण अशाच काही सोप्या आणि उपयुक्त पध्दती पाहणार आहोत ज्या विद्यार्थ्यांना गुणाकार अधिक सोपा आणि रोचक बनवतील.

**पाढे पाठ असणे- गुणाकाराचा पाया:**

गुणाकार शिकताना सर्वात पहिले आणि आवश्यक पाऊल म्हणजे पाढे पाठ असणे. किमान १ ते २० पर्यंतचे पाढे विद्यार्थ्यांनी पाठ केले पाहिजेत. पाढे म्हणजेच गुणाकाराची तक्ता स्वरूपातील माहिती असल्यामुळे, मूलभूत उदाहरणे सोडवताना वेळ आणि मेहनत वाचते.

उदा. ७×६ = ४२ जर पाठ असेल, तर लगेच उत्तर मिळते. यामुळे विद्यार्थ्यांना आत्मविश्वास मिळतो.




**संख्यांमध्ये नमुने ओळखणे:**

गुणाकार करताना काही विशिष्ट संख्यांचे नमुने लक्षात घेतल्यास तो सोपा वाटतो.

उदाहरण:

५ च्या पाढ्यात शेवटचे अंक ० किंवा ५ असतात...

५ × १ =५, ५×२ =१०, ५×३ =१५

९ च्या पाढ्यात उत्तरातील अंकांची बेरीज ९ येते...

९ ×२ =१८ (१+८=९), ९×३ =२७ (२+७ =९)

११×१ ते ११×९ पर्यंत उत्तरात संख्या दुप्पट येतात:

११×३=३३, ११×४=४४

सदर सूत्र लक्षात ठेवल्यास मुलांना काही उदाहरणे विना-हिशेबच सोडवता येतात.

**क्षेत्रफळ पध्दती (Area Method / Box Method):**

सदर पध्दत विशेषत: मोठ्या संख्यांच्या गुणाकारासाठी उपयोगी आहे. यात संख्यांना त्यांच्या स्थानमूल्यानुसार विभागून त्यांचे स्वतंत्र गुणाकार करुन नंतर त्यांची बेरीज केली जाते.

**उदाहरण:** ३४ × १२

३४=३०+ ४

१२=१०+ २

**आता प्रत्येक संख्येचा गुणाकार** :

३० × १०=३००

३० × २=६०

४ × १०=४०

४ × २=८

**नंतर सर्व उत्तरे एकत्र करा:**

३००+ ६०+ ४०+८=40८

सदर पध्दत विद्यार्थ्यांना संख्यांची रचना समजून घेण्यास मदत करते. विभाजन करून सोडवणे (Breaking Method) गुणाकारात मोठ्या संख्येचा छोट्या भागांत विभाग करुन उत्तर मिळवणे, एक अतिशय सोपी आणि प्रभावी पध्दत आहे.

**उदाहरण:** २५ × १६

२५=५ ×५ किंवा १६=४ × ४

तर, २५ × १६(५ × ५) × (४ × ४)

=(५ × ४) × (५ × ४)

=२० × २०=४००

किंवा

१६=१०+६

२५ × १०=२५०

२५ × ६=१५०

मग २५०+ १५०=४००

**शॉर्टकट पध्दती (विशिष्ट संख्यांसाठी):**

काही विशिष्ट पध्दतींचा वापर करून लगेच उत्तर मिळवता येते...

**२ अंकी संख्येचा स्वत:सोबत गुणाकार:**

**उदाहरण:** ४५×४५

सूत्र: $(x+y)^2 = x^2 + 2xy+y^2$

४५=४०+५

४५ × ४५ = ४०$^{2}$+२×४०×५+५$^{2}$ = १६००+ ४००+२५=२०२५

९ ने गुणाकार करताना:

**उदाहरण:** ६७ × ९

**सूत्र:** ६७ × ९=(६७ × १०) - ६७=६७०-६७=६०३

**हाताची बोटे वापरुन ९ चा पाढा...**

छोट्या मुलांसाठी ९ चा पाढा शिकण्यासाठी हाताची बोटे वापरण्याची एक मजेदार पध्दत आहे.

- दोन्ही हात समोर धरावेत.
- ज्या क्रमांकाच्या पाढ्याचे उत्तर हवे आहे, त्या क्रमांकाचे बोट खाली वाकवावे.
- त्याच्या डाव्या बाजुच्या बोटांची संख्या दशक स्थानाचा अंक, उजव्या बाजुची संख्या एकक स्थानचा अंक.

उदाहरण: ९ × ४

चौथे बोट खाली वाकवा. डावीकडे ३ बोटे, उजवीकडे ६ बोटे.

उत्तर=३६

मेंदूला चालना देणारे खेळ-पझल्स: गुणाकाराचे सरावासाठी खेळांचा उपयोग करणे उपयुक्त ठरते. गणिती कोडी, कार्ड गेम्स, फ्लॅश कार्डस्, वेळेवर उत्तर द्या असे खेळ विद्यार्थ्यांना शिकवताना रंजकता वाढवतात आणि सराव होतो.

**तोंडी गणिताचा सराव:** गुणाकाराच्या उदाहरणांचा तोंडी सराव केल्यास विद्यार्थी जलदगतीने विचार करू लागतात. दररोज ५-१० उदाहरणांचा सराव फायद्याचा ठरतो.

**उदाहरण:** शिक्षक वर्गात विचारु शकतो...

१२× ८ किती?, २५ × ४ किती?

यामुळे विद्यार्थ्यांची प्रतिसाद क्षमता वाढते.

99675 20006 | aaplenaveshahar | NaveShahar | Nave Shahar | Nave Shahar

# 'पंचायतन मंदिर'चा वर्धापन दिन उत्साहात साजरा

## सोहळ्याला विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती

**पनवेल** : पनवेलचे माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे यांच्या संकल्पनेतून 'जे. एम. म्हात्रे चॅरिटेबल संस्था'च्या माध्यमातून पंचायतन मंदिर, नढाळ वाडी, चौक तालुका खालापूर येथे १३ मे २०२२ रोजी या मंदिरांचा भव्यदिव्य असा प्राणप्रतिष्ठा सोहळ्याद्वारे स्थापना करण्यात आली. श्री. मयुरेश्वर गणेश, संकटमोचन श्री. हनुमान, श्री. साईबाबा, श्री. भवानी माता आणि नढाळेश्वर महादेव या पाच मंदिरांचे 'भव्य-दिव्य' असे आध्यात्मिक संकुल उभारण्यात आले आहे. यावर्षी मंदिराचा तिसरा वर्धापन दिन सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला. या सोहळ्यात हरिपाठ, श्रीं ची पालखी मिरवणूक दिंडी सोहळा, संगीत भजन अशा विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

यावर्षी महाराष्ट्र विधानसभा उपाध्यक्ष ना. अण्णासाहेब बनसोडे, लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर, खासदार धैर्यशील पाटील, आमदार प्रशांत ठाकूर, पनवेल पंचायत समिती माजी सभापती काशिनाथ पाटील, कृ.ऊ.बा.समिती सभापती नारायण घरत, भाजप रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, भाजपा ज्येष्ठ नेते नंदकुमार पटवर्धन, खालापूर माजी नगराध्यक्ष सौ. शिवानी जंगम, शेकाप खालापूर तालुका चिटणीस संतोष जंगम तसेच माजी नगरसेवक-नगरसेविका, पदाधिकारी, भक्तगण मोठ्या संख्येने उपस्थित होते.



"'पंचायतन मंदिर'तर्फे पायी दिंडी चालत जाणाऱ्या सर्व भक्तांसाठी सभागृहात राहण्याची मोफत सेवा देण्यात येते. भक्तांसाठी अत्यल्प दरात भक्त निवासाची व्यवस्था या ठिकाणी आहे. दर्शनासाठी येणाऱ्या सर्व भाविकांना मोफत चहा-पाणी अन्न सेवा संस्थेच्या माध्यमातून देण्यात येते. सांप्रदायिक, भजन कीर्तन कार्यक्रमासाठी मोफत सभागृहाची व्यवस्था करण्यात आली आहे. शैक्षणिक सेवेच्या दृष्टीने परिसरातील हिमांशू दिलीप पाटील इंग्लिश मीडियम स्कुल मधून अत्यल्प दरात इंग्रजी माध्यमाची शिक्षण सेवा देण्यात येते. शाळेमध्ये पालक नसणाऱ्या आणि आर्थिक दृष्ट्या सक्षम नसणाऱ्या विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण सेवा आणि आवश्यक ते सहकार्य अशाप्रकारे विविध सुविधा श्री क्षेत्र पंचायतन मंदिराच्या परिसरातून देण्यात येतात. **-प्रितम जनार्दन म्हात्रे, अध्यक्ष-जे. एम. म्हात्रे चॅरिटेबल संस्था.**

## कळंबोली मध्ये अंडरआर्म बॉक्स क्रिकेट स्पर्धा

पनवेल : भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा कळंबोली यांच्या संयुक्त विद्यमाने माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त १७ आणि १८ मे रोजी कळंबोलीमध्ये भव्य अंडरआर्म बॉक्स क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

सदर स्पर्धा रोडपाली येथील नवीन बस डेपो जवळील मैदानावर दिवस-रात्र रंगणार असून स्थानिक क्रिकेट प्रेमींसाठी ती पर्वणी ठरणार आहे. तसेच विविध संघांमध्ये चुरस पाहायला मिळणार असून स्पर्धेचे पारितोषिक वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे. स्पर्धेसाठी आकर्षक बक्षिसांची घोषणा करण्यात आली आहे. त्यामध्ये स्पर्धेतील प्रथम पारितोषिक २१,१११ रुपये आणि भव्य चषक, द्वितीय क्रमांकाला ११,१११ तर तृतीय आणि चतुर्थ क्रमांकाला प्रत्येकी ५,५५५ रुपये आणि चषक देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात येणार आहे. या स्पर्धेमुळे परिसरातील युवकांना खेळातील कौशल्य दाखवण्याची उत्तम संधी उपलब्ध होणार आहे.

# कोकण रेल्वे मार्गावर १५ जून पासून पावसाळी वेळापत्रक

**मुंबई** : मान्सूनचे अंदमान-निकोबार बेट परिसरात आगमन झालेले आहे. त्यामुळे मान्सून टप्प्याटप्प्याने केरळ मार्गे महाराष्ट्रात दाखल होणार आहे. मान्सूनच्या पार्श्वभूमीवर इतर यंत्रणांप्रमाणे रेल्वे प्रशासन देखील अलर्ट मोडवर आले आहे. त्यानुसार दरवर्षीप्रमाणे यंदा देखील कोकण रेल्वे मार्गावर येत्या १५ जून पासून पावसाळी वेळापत्रक लागू होणार आहे, अशी माहिती 'पश्चिम रेल्वे'चे मुख्य जनसंपर्क अधिकारी विनीत अभिषेक यांनी परिपत्रकाद्वारे जारी केली.

पावसाळी कालावधीमध्ये 'कोकण'मधील डोंगराळ भागांमध्ये रेल्वेमार्गावर दरडी कोसळणे किंवा तत्यम घटनांनी अनेकदा रेल्वे वाहतूक विस्कळीत होते. या घटनाच्या पार्श्वभूमीवर कोकण रेल्वे मार्गावर आपात्कालीन घटना रोखण्यासाठीच्या काही उपाययोजना राबवल्या असून, त्याच धर्तीवर सावधगिरी म्हणून रेल्वेच्या वेळापत्रकांमध्ये दरवर्षी बदल करण्यात येतो. यादरम्यान रेल्वे गाड्यांची वेगमर्यादा कमी ठेवली जाते. पावसाळ्यात रेल्वे गाड्यांचा वेग ताशी १२० कि. मी. ऐवजी ७५ कि.मी. वर आणला जातो, जो कधी कधी मुसळधार पावसात ताशी ४० कि.मी. वरही आणला जातो.

परिपत्रकात नमूद केल्याप्रमाणे पावसाळ्याच्या दिवसांमध्ये कोकण रेल्वे विभागातील सर्व मेल-एक्सप्रेस आणि प्रवासी गाड्यांच्या वेळा १५ जून ते २० ऑक्टोबर २०२५ या कालावधीत तात्पुरत्या स्वरूपात बदलण्यात येतील. यामध्ये काही ट्रेनचा वेह कमी केला जाणा असून काही गाड्या रद्दही केल्या जाण्याची शक्यता आहे. जून पासून ऑक्टोबरपर्यंत पावसाळी वेळापत्रक लागू राहणार असून, गणेशोत्सवाचे दिवसही याच कालावधीत येत आहे. त्यामुळे आतापासूनच कोकणवासियांनी गणपतीच्या सुट्ट्यांचे नियोजन करुन घ्यावे. पावसाळी वेळापत्रकामुळे कोकणात जाणाऱ्या २३ गाड्यांच्या वेळेमध्ये बदल करण्यात येतील.

### प्रभावित होणाऱ्या रेल्वेगाड्या...

नवीन वेळापत्रकानुसार सीएसएमटी-वंदे भारत एक्स्प्रेस १६६ जून ते २० ऑक्टोबर दरम्यान ६ दिवसांऐवजी सोमवार, बुधवार आणि शुक्रवार या दिवशी धावेल. तर १७ जून ते १९ ऑक्टोबर दरम्यान २२२३० सीएसएमटी-मडगांव एक्स्प्रेस गाडी मंगळवार, गुरुवार आणि शनिवारी धावेल. २२११९ मडगांव- सीएसएमटी ट्रेन मंगळवार, गुरुवार आणि शनिवारी धावेल. तर, २२१२० मडगांव-सीएसएमटी ट्रेन बुधवार, शुक्रवार आणि रविवारी निर्धारित वेळेत धावेल. ११०९९ एलटीटी-मडगांव ट्रेन शुक्रवार आणि रविवाकी धावणार असून, १११०० मडगांव-एलटीटी गाडी शनिवार आणि सोमवार दरम्यान नियोजित वेळेनुसार धावेल.

# तुर्भे ग्रामस्थ बनले 'एमपीसीबी'चे प्रादेशिक अधिकारी



**सानपाडा** : तुर्भे गावातील ग्रामस्थ आणि आगरी समाजातील तरुण व्यक्तीमत्त्व निखील निलकंठ घरत यांनी 'महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण महामंडळ'च्या (एमपीसीबी) प्रादेशिक अधिकारी पदासाठी झालेल्या मुलाखतीमध्ये महाराष्ट्र राज्यातून प्रथम क्रमांक पटकविला आहे. निखील घरत यांची नियुक्ती कोल्हापूर विभागीय प्रादेशिक महामंडळात करण्यात आली आहे.

सदर कामगिरीबद्दल निखील घरत यांचे 'महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी'चे सचिव डॉ. विनोद बाबुशेठ पाटील, 'नवी मुंबई युवक काँग्रेस'चे सरचिटणीस विजय बाबुशेठ पाटील, 'शिवछाया मित्र मंडळ'चे सदस्य नंदकुमार जगन्नाथ पाटील आदिंनी अभिनंदन करीत त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# टॅक्सी-ऑटोरिक्षा भाडेमीटर

## रिकॅलीब्रेशनसाठी ३१ मे पर्यंत मुदतवाढ

ठाणे : मुंबई महानगर क्षेत्र परिवहन प्राधिकरणाच्या २३ जानेवारी २०२५ रोजीच्या बैठकीमध्ये मुंबई महानगर क्षेत्र परिवहन प्राधिकरण क्षेत्रातील काळी-पिवळी मीटर टॅक्सी (सीएनजी) आणि ऑटोरिक्षा (सीएनजी) यांच्या भाडेदर वाढीचा निर्णय घेण्यात आला आहे. सुधारित भाडेवाढीप्रमाणे अद्यापही मीटर टॅक्सी आणि ऑटोरिक्षा वाहनांचे भाडेमीटर रिकॅलीब्रेशनचे काम बाकी असल्याने टॅक्सी-ऑटोरिक्षा भाडेमीटरचे रिकॅलीब्रेशन करण्याकरिता ३१ मे २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय मुंबई महानगर क्षेत्र परिवहन प्राधिकरणाच्या ३० एप्रिल रोजीच्या बैठकीमध्ये घेण्यात आला आहे.

मुदतवाढ समाप्तीनंतरच्या प्रत्येक दिवसाच्या विलंबासाठी विभागीय दंडात्मक शुल्क प्रतिदिन ५० रुपये आकारण्याचा निर्णय १ जून २०२५ पासून लागू होईल. या निर्णयाची सर्व मीटर टॅक्सी आणि ऑटोरिक्षा चालकांनी नोंद घ्यावी, असे आवाहन ठाणे उप-प्रादेशिक परिवहन अधिकारी रोहित काटकर यांनी केले आहे.

# सीबीएसई दहावी, बारावी परीक्षेत रामशेठ ठाकूर पब्लिक स्कुलचा १०० टक्के निकाल




**पनवेल** : 'जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था'च्या खारघर येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कुलने पुन्हा एकदा आपली शैक्षणिक उत्कृष्टतेची परंपरा कायम राखली आहे. केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ (सीबीएसई) इयत्ता बारावी आणि दहावीच्या परीक्षेच्या निकालात शाळेने १०० टक्के यश मिळवले. याबद्दल संस्थेचे चेअरमन, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

सीबीएसई बारावीसाठी शाळेतून एकूण २०५ विद्यार्थी बसले होते, ज्यात १६२ विद्यार्थी विज्ञान शाखेचे आणि ४३ विद्यार्थी वाणिज्य शाखेचे होते. सर्व विद्यार्थ्यांनी यशस्वीरीत्या परीक्षा उत्तीर्ण केली असून विविध विषयांमध्ये उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे. यात ४६ विद्यार्थ्यांनी ९० टक्केपेक्षा अधिक गुण मिळवले. १६७ विद्यार्थ्यांनी ७५टक्के पेक्षा अधिक गुण मिळवत डिस्टिंक्शन प्राप्त केले. १०० पैकी १०० गुण प्राप्त करणाऱ्य विद्यार्थ्यांमध्ये इंग्रजी ४ विद्यार्थी, गणित १ विद्यार्थी, शारीरिक शिक्षण १ विद्यार्थी, व्यवसाय अभ्यास १ विद्यार्थी, अर्थशास्त्र १ विद्यार्थी आहे.

तर सीबीएसई दहावीला शाळेतून एकूण २९० विद्यार्थी परीक्षेला बसले होते आणि सर्वच्या सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले. यात ९० टक्केपेक्षा जास्त गुण प्राप्त केलेले विद्यार्थी ११५, ७५ टक्केपेक्षा जास्त गुण (विशेष प्राविण्य) प्राप्त विद्यार्थी २३२ असून विषयवार १०० पैकी १०० गुण प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांमध्ये आर्टिफिशियल इंटेलिजन्स १७ विद्यार्थी, डेटा सायन्स २३ विद्यार्थी, विज्ञान ३ विद्यार्थी, गणित १ विद्यार्थी, इंग्रजी २ विद्यार्थी, मराठी १ विद्यार्थी आहेत.

या यशामागे विद्यार्थ्यांचे सातत्यपूर्ण परिश्रम, शाळेतील प्रशिक्षित व समर्पित शिक्षकवर्गाचे मार्गदर्शन तसेच मुख्याध्यापिका राज अलोनी यांचे नेतृत्व आहे. रामशेठ ठाकूर पब्लिक स्कुल भविष्यातील नेतृत्व घडवणारी संस्था म्हणून सतत प्रगतीपथावर आहे. शिक्षणाच्या क्षेत्रात तेजस्वी दीपस्तंभासारखी उजळत आहे. या यशाबद्दल शाळेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सर्व विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांचे अभिनंदन करीत आनंद व्यक्त केला.

# श्री ज्ञानाई शाळेचा दहावी निकाल ९२ टक्के

**पनवेल**: शिक्षण विकासाचे प्रवेशद्वार असून, ते सर्वांपर्यंत पोहोचावे या उद्देशाने कार्यरत असलेल्या आनंदी दिनकर कोळी शिक्षण प्रसारक मंडळाच्या पनवेल तालुक्यातील वाजे धामणी येथील श्री ज्ञानाई माध्यमिक विद्यालयाने अनोखा आदर्श घालून दिला आहे. या विद्यालयात केवळ आदिवासी मुले आणि मुली शिक्षण घेत असून, त्यांना सर्व प्रकारच्या सुविधा विनामूल्य पुरविल्या जात आहेत.

३००हून अधिक विद्यार्थ्यांसाठी मोफत शिक्षण...

सध्या या विद्यालयात सुमारे ३०० हून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. विशेष म्हणजे या विद्यार्थ्यांकडून कोणत्याही प्रकारचे शुल्क घेतले जात नाही. एवढेच नव्हे, तर विद्यार्थ्यांचा शाळेत येण्या-जाण्याचा खर्च, त्यांना लागणारे भोजन, गणवेश आणि इतर शैक्षणिक साहित्य सर्व काही संस्थाच पुरवते. यामुळे आर्थिक परिस्थितीमुळे शिक्षणापासून वंचित राहणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांसाठी सदर विद्यालय एक वरदान ठरले आहे.

**दहावीचा देदीप्यमान निकाल...**

या वर्षीच्या दहावीच्या परीक्षेत श्री ज्ञानाई माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी नेत्रदीपक यश संपादन केले आहे. शाळेचा निकाल तब्बल ९२ टक्के लागला आहे. सदर बाब संस्थेच्या अथक प्रयत्नांची आणि विद्यार्थ्यांच्या कष्टाची साक्ष देते.

# पाण्यावाचून नवी मुंबईकरांचे प्रचंड हाल

## शटडाऊन कालावधी वाढल्याने परिणाम

**वाशी** : नवी मुंबई महापालिकेच्या वतीने मुख्य जलवाहिनीच्या देखभाल-दुरुस्तीसाठी १४ ते १५ मे असा २४ तासांचा शटडाऊन घेतला होता. तर दुपारी १२ नंतर पाणी पुरवठा सुरळीत केला जाईल, असे पाणी पुरवठा विभागाने कळविले होते. मात्र, दिलेल्या कालावधीत काम पूर्ण न झाल्याने रात्री उशिरापर्यंत नळ कोरडे पडले होते. त्यामुळे ३० तासानंतरही नळाला पाणी न आल्याने पाण्याविना नवी मुंबईकरांचे प्रचंड हाल झाले.

नवी मुंबई महापालिकेच्या मोरबे मुख्य जलवाहिनीवरील आग्रोळी ब्रीज जवळ रेल्वे ट्रॅक शेजारी आणि चिखले गावाशेजारील ब्रीज खालील जलवाहनी वारंवार पाणी गळती होत आहे. सदर ठिकाणची जलवाहिनी बदलण्याचे काम १४ मे रोजी हाती घेण्यात आले आहे. त्यामुळे भोकरपाडा जलशुध्दीकरण केंद्रावरून नवी मुंबई शहराला होणारा पाणी पुरवठा १४ मे दुपारी १ ते १५ मे दुपारी १२ असा २४ तास बंद ठेवण्यात आला होता. महापालिका पाणी पुरवठा विभागाकडून संध्याकाळ पर्यंत पाणी पुरवठा सुरळीत होईल, असे सांगण्यात येत होते. परंतु, सदर काम वेळेत पूर्ण झाले नाही.

महापालिका सूत्रांनी माहिती दिल्यानुसार सदर काम पूर्ण होण्यास रात्री १२ वाजणार होते. त्यामुळे सायंकाळी उशिरापर्यंत नळाला एक थेंबही पाणी नसल्याने नागरिकांची चांगली धावपळ झाली. अनेक सोसायट्यांना वापराच्या पाण्यासाठी टँकर मागवावे लागले. तसेच अनेकांना पिण्याच्या आणि स्वयंपाकाच्या पाण्यासाठी बिसलेरी पाण्याचा आधार घ्यावा लागला. एकंदरीतच पाण्याविना नागरिकांचे हाल झाले.

# समाजसेवकाच्या जिद्दीला सलाम -महेंद्र घरत



**उलवे** : गव्हाणच्या मनोज फडकर याने अतिशय खडतर परिस्थितीत दिवस काढले. आई-वडिलांच्या अकाली निधनामुळे तो पोरका झाला. परिस्थितीनुरुप 'हरकाम्या' म्हणून त्याने काम केले; पण डगमगला नाही. शरीराने दिव्यांग असला तरी धडपड्या स्वभाव, प्रचंड जिद्द आणि मेहनतीने मनोजने करून दाखवले. आज गव्हाणमध्ये तो गोरगरीबांना मदत करतोय, प्रथितयश नागरिक म्हणून नावारुपाला आला आहे. सन्मानाने जगतोय. अक्षरश: त्याने शून्यातून विश्व निर्माण केल्याचा प्रत्यय आणून दिला आहे. त्यामुळे त्याच्या जिद्दीला सलाम, त्याच्या कार्यकर्तृत्वामुळे मनस्वी आनंद होत आहे, असे गौरवोद्गार आंतरराष्ट्रीय कामगार नेते तथा 'काँग्रेस'चे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांनी काढले.

जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांच्या हस्ते गणेशनगर, करंजा येथे प्रथम एकदंत बंगल्याचे उदघाटन झाले. त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी शुभांगी घरत आणि एमजी ग्रुप टीम उपस्थित होती.

यावेळी महेंद्र घरत यांनी मनोज फडकर याचे अभिनंदन केले आणि दोस्त, आगे बढो, असा आशीर्वाद दिला.

# सरकारी कार्यालयाच्या महसूल जागेवर अतिक्रमण

## तहसीलदार संरक्षण देणार की कारवाई करणार? नागरिकांचा प्रश्न

**भिवंडी** : भिवंडी तालुक्यातील अंबाडी जिल्हा परिषद गटाचे सदस्य असताना कैलास दत्तात्रेय जाधव यांनी आपल्या पदाचा दुरुपयोग करुन त्यांनी सरकारी खाण सर्वे क्र.९२, सर्वे नं.१२३/१ या शासनाच्या जमिनींवर गेल्या अनेक वर्षांपासून अतिक्रमण केले आहे. सदर जागेत असलेले तलाठी व मंडळ कार्यालय तसेच झुणकाभाकर केंद्र तोडून त्यावर खाजगी आणि व्यावसायिक बांधकामे केली आहेत. याबाबत स्थानिक नागरिकांनी तक्रार केल्यानंतर देखील महसूल विभागाचे अधिकारी केवळ कागदी घोडे नाचवित असून आपल्या कार्यालयांतर्गत कोणतीही फौजदारी अथवा अतिक्रमण काढण्याची ठोस कारवाई करीत नसल्याने अंबाडी परिसरात आणि तालुक्यातील नागरिकांमध्ये उलटसुलट चर्चा सुरु झाल्या आहेत.

माजी जिल्हा परिषद सदस्य कैलास जाधव यांनी सरकारी जागेवर केलेल्या अतिक्रमणा विरोधात अंबाडी ग्रामपंचायतीचे सदस्य तथा उबाठा शिवसेना उपतालुका प्रमुख संतोष गोविंद पाटील यांनी भिवंडी तहसीलदार आणि विरोधी पक्षनेता अंबादास




दानवे यांच्याकडे तक्रार केली आहे. त्यानुसार स्थानिक मंडळ अधिकारी यांनी भिवंडी तहसीलदारांना दिलेल्या अहवालानुसार मौजे झिडके येथील स.नं.९२ क्षेत्र ०.१२.० हे.आर अशी जमीन ७/१२च्या भोगवटादार सदरी खाणीकडे अशी नोंद दाखल आहे. तसेच या सर्वे नंबरच्या इतर हक्कात तलाठी कार्यालय व मंडळ अधिकारी कार्यालय अशी नोंद दाखल आहे. त्यानुसार या जागेत अंबाडी तलाठी कार्यालय होते, ते तोडून कैलास जाधव यांनी त्यांच्या घराकडे जाण्यायेण्यासाठी रस्ता तयार केला आहे. त्याचप्रमाणे त्यांनी सदर जागेत व्यापारी कारणासाठी दुकान गाळे बांधलेले असून ते भाड्याने दिलेले आहेत. याशिवाय सदर जागेत असलेले झुणका भाकर केंद्र पाडून तेथे कैलास जाधव यांचे छत्रपती जनसंपर्क कार्यालयाचे बांधकाम केलेले आहे.

मौजे अंबाडी स.नं. १२३/१ क्षेत्र ४.५३.०४. हे.आर जमीन ७/१२ वर महसूल खाते म्हणून दाखल असून सदर जमिनीवर कैलास जाधव यांनी आंबे, पेरू, चिकु. नारळ अशी फळझाडे लागवड केली असुन या जागेत त्यांचे शंतपर, दत्तमंदिर, समर्थ पोलीक्राफ्ट एलएलपी अशी यांधकामे असल्याचे अंबाडी मंडळ अधिकारी कार्यालयाने तहसीलदारांच्या निदर्शनास आणून दिलेले आहे. महाराष्ट्र विधान परिषदेचे विरोधी पक्षनेता अंबादास दानवे यांनी याबाबत राज्याच्या महसूल विभागाच्या अप्पर मुख्य सचिवांना लेखी तक्रार केली असता भिवंडी तालुक्याचे तहसीलदार अभिजित खोले यांनी २० मार्च २०२५ रोजी कैलास जाधव यांना नोटीस बजावून महसूल विभागाच्या जागेवरील अतिक्रमण काढण्यास सांगितले आहे. तर सदर नोटीसमध्ये भोगवटादार यांना २ दिवसाच्या आत अतिक्रमण जागेबाबत पुरावा सादर करण्याचा कालावधी नमूद केला आहे.

दरम्यान, सदर नोटीसला २० मे रोजी २ महिने पूर्ण होतील. मात्र, तहसील कार्यालयातून कोणतीही फौजदारी अथवा अतिक्रमण निष्कासनाची कारवाई झाली नाही. अद्याप अंबाडीच्या सरकारी जागेवरील अतिक्रमण न हटविल्याने नागरिकांमध्ये भिवंडी तहसील कार्यालयाविरोधात संशय निर्माण झाला असून अधिकारी महसुली कार्यालयाच्या जागेवर अतिक्रमण करणाऱ्यांना संरक्षण देणार की नियमानुसार दिलेल्या नोटीस नुसार पुढील कारवाई करणार? ते जाहीर करावे, अशी विनंती तक्रारदार संतोष पाटील यांनी केली आहे.



Owner **Kailash Shankarlal Gindodia,** Publisher **Shiv Kailash Gindodia,** Printer **Kailash Shankarlal Gindodia** Printed at **Siddhakala Print Media & Publications Pvt. Ltd.,** Plot No. W-230, T.T.C. Ind. Area, MIDC, Khairane, Navi Mumbai – 400 710 and Published from **1314, 13th Floor, Real Tech Park, Plot No. 39/2, Sector - 30A, Vashi, Navi Mumbai - 400 703, Editor:** Shailesh Jadhav • **RNI No.- 61792/94** • **ABC Certificate no. 133/2105** • **Tel. :** 022- 2781 5380/2087 0513 • **Email :** contact@naveshahar.com • www.naveshahar.com, Post.Reg.:NMB/136/2024-2026/Vashi MDG P.O.